वर्ष 01, अंक 19
1-15 एप्रिल 2021 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार





## राष्ट्र उभारणीचा नवा मार्ग

सूचना मागवून अर्थसंकल्प सादर करण्याची परंपरा कायम राखत आता तरतुदींमधून उपाययोजनांच्या दिशेने पहिल्यांदाच एखाद्या सरकारचा अभूतपूर्व उपक्रम

# शहिदांना अभिवादन ...

13 एप्रिल 1919 रोजी वैशाखीच्या प्रसंगी अमृतसरच्या जालियनवाला बाग येथे झालेल्या हत्याकांडाला 102 वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत. त्यादिवशी या ठिकाणी 22 वर्षांचे नानक सिंह देखील उपस्थित होते. जेव्हा नानक गोळीबारातून वाचले तेव्हा त्यांनी या भीषण हत्याकांडावर 'खुनी वैशाखी' नावाची कविता लिहिली. यामुळे खवळलेल्या ब्रिटीशांनी त्यावर बंदी घालून मूळ प्रत जप्त केली. त्याच कवितेचा मूळ भाग ...

जलियां वाले बाग विच इक्ठ्ठ  
पंच वजे अप्रैल दी तेहरवीं न,  
लोकीं बाग वल होए रवान चले।  
दिलां विच इनसाफ दी आस रख के,  
सारे सिख हिन्दू मुसलमान चले।  
विरले आदमी शहिर विच रहे बाकी,  
सब बाल ते बिरध जवान चले।  
अज दिलां दे दुख सुणान चले,  
सगों आपने गले कटवाण चले।  
छड़ दिउ हुण आसरा जीवने दा,  
क्योंकि तुसीं हुण छड जहान चले।  
किस ने आवणा परत के घरां अंदर,  
दिल दा दिलां विच छोड़ अरमान चले।  
जलिआं वालड़े उजडे बाग ताईं,  
खून डोल के सबज़ बणान चले।  
अज होएके सब पतंग कटे,  
उपर शमा सरीर जलाण चले।  
हां हां जीवने तों डाढे तंग आ के,  
रुठी मोत नूं आप मनाण चले।  
अनल-हक मनसूर दे वांग यारो,  
सूली आपनी आप गड़ाण चले।  
वांग शमस तबरेज दे खुशी हो के,  
खलां पुठीआं अज लुहाण चले।



न्यू इंडिया
# समाचार
वर्ष 01, अंक 19 | 1 ते 15 एप्रिल, 2021

**संपादक**
**जयदीप भटनागर**
प्रधान महासंचालक,
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

सल्लागार संपादक
**संतोष कुमार**
**विनोद कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**विभोर शर्मा**

**प्रकाशक आणि मुद्रक**
**सत्येंद्र प्रकाश**
प्रधान महासंचालक, बीओसी
( ब्युरो ऑफ आउटरिच अँड कम्युनिकेशन )

**मुद्रण :** विबा प्रेस प्रायव्हेट लिमिटेड,
सी-66/3,
ओखला औद्योगिक क्षेत्र, फेज-2,
नवी दिल्ली- 110020

**प्रकाशन स्थळ :** ब्युरो ऑफ
आउटरिच अँड कम्युनिकेशन,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली -110003
**ईमेल - response-nis@pib.gov.in**

**व्यावसायिक डिझायनर**
श्याम शंकर तिवारी

आर एन आय क्रमांक
DELMAR/2020/78830

## आतील पानांवर

### विश्वासाच्या पायावर अर्थसंकल्पाची अंमलबजावणी



**मुखपृष्ठ कथा** प्रथमच सर्वसाधारण अर्थसंकल्प प्रत्यक्षात साकारण्यासाठी सर्व क्षेत्रातील प्रतिनिधींशी संवाद-समन्वय साधण्याची नवीन सुरुवात | पान 12-21

**महत्वाकांक्षी योजना**
**प्रधानमंत्री मुद्रा योजना : लघु व्यापा-यांचा भक्कम आधार**
पान 26-27

**पर्यावरणास अनुकूल वाहतुकीच्या दिशेने वाटचाल इलेक्ट्रिक वाहनांना**



**प्रोत्साहन आणि बीएस -6 इंधनाचा क्रांतिकारक पुढाकार**
पान 22-25

**बातम्यांचा गोषवारा**
देशातील महत्वाच्या घडामोडी | पान 4-5

**पहिल्या स्वातंत्र्य लढ्याची भूमी**
ओदिशाच्या स्थापना दिनानिमित्ताने खास | पान 6

**बाबासाहेब, समतावादी समाजाचे प्रेरक**
कहाणी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांची | पान 7

**सागरी क्षेत्रांच्या विकासाच्या दिशेने भारताची आगेकूच**
मेरीटाइम इंडिया व्हिजन- 2030 | पान 11

**आता आरोग्यासाठी सुरक्षित 'निधी'चा आधार**
केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय | पान 28

**जन औषधी केंद्र बनले गरीब-मध्यमवर्गाचे सोबती**
लोकांच्या जीवनाचा आधार बनत आहे जन औषधी केंद्र | पान 29

**लस मैत्री : कोरोना विरुद्धच्या लढाईत भारताचा जगाला बुस्टर डोस**
जगातील 71 देशांना 5.86 कोटी लसी पाठवल्या | पान 30-31

**मैत्री सेतु :** भारत आणि बांगलादेश दरम्यान 'नवीन व्यापार मार्गिका'फेनी नदीवरील 1.9 किमी लांबीच्या पुलामुळे त्रिपुराच्या विकासाला गती | पान 32

**क्वाड :** भारत-प्रशांत महासागर क्षेत्रात स्थिरतेसाठी महत्वपूर्ण स्तंभ भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामरिक भागीदारी | पान 33

**शतकानुशतके गीता हा भारताच्या कर्म निष्ठेचे प्रतीक आहे**
अध्यात्म गीतेच्या किंडल आवृतीचा शुभारंभ | पान 34

**प्रेम, त्याग आणि बलिदानाचे प्रतीक असलेले गुरु तेग बहादूर**
गुरु तेग बहादूरजी यांच्या जन्मदिनानिमित्त खास | पान 35

**प्रेरणेचा झरा...** बदलत्या भारताची गाथा | पान 36



**स्वातंत्र्याचा 75 वा वर्धापन दिन, शताब्दी वर्षाचा संकल्प 137 कोटी देशवासियांसह भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सुरुवात. जगासमोर आपल्या 75 वर्षांची कामगिरी दाखविण्याची संधी | पान 08-10**

# संपादकांच्या लेखणीतून..

सप्रेम नमस्कार।

भारतीय संस्कृतीत उत्सवाला खूप महत्त्व आहे. राष्ट्रहितासाठी केलेला संकल्प हा कोणत्याही सणापेक्षा कमी नाही. सामूहिकतेच्या सामर्थ्याने या संकल्पाला मोठ्या यशाकडे नेले जाते.

जेव्हा सरकारच्या कोणत्याही प्रयत्नांमुळे देशात चहूबाजूला नवीन आशेचे वातावरण तयार होते, वेगवान हालचाली करण्याची इच्छा असते, तेव्हा सरकारकडून विशिष्ट प्रकारचे निकाल अपेक्षित असतात. जेव्हा सर्वसाधारण अर्थसंकल्पावरील सकारात्मक अभिप्रायाने देशाचा कल व्यक्त झाला आहे, तेव्हा केंद्र सरकारनेही अभूतपूर्व पावले उचलली आहेत. संसदीय इतिहासात प्रथमच अर्थसंकल्पातील संकल्पांची पूर्तता करण्यासाठी पंतप्रधानांनी सर्व हितधारक, विशेषज्ञ आणि इतरांशी स्वतः संवाद साधण्यासाठी पुढाकार घेतला आहे. अर्थसंकल्पीय घोषणांची जलदगतीने अंमलबजावणी कशी करावी, सरकार व खासगी क्षेत्राने एकमेकांवरचा विश्वास वृद्धिंगत करत कसे पुढे जावे, हे त्याचे उद्दीष्ट आहे. असा आत्मनिर्भर भारत साकारण्याची सरकारची इच्छा आहे जिथे प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक संस्था आणि प्रत्येक उद्योग यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेसह पुढे जाण्याची संधी मिळेल. ही विचारसरणी या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

उत्सव आणि संकल्पांच्या मालिकेत आम्ही स्वातंत्र्याचा 75 वा वर्धापन दिन स्वातंत्र्याचा 'अमृत महोत्सव' म्हणून साजरा करत आहोत. भारत आपल्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्धापन दिनानिमित्त 2047 साठी नवा संकल्प घेऊन आपल्या-75 वर्षांच्या विकास प्रवासाचे स्मरण करीत आहे. आपल्या सैनिकांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन भारत कसे मार्गक्रमण करेल हा या वेळच्या अंकाचा भाग आहे.


श्री गुरु तेग बहादुरजी उत्कल दिनी ओडिशाच्या पाईक सेनानींची कथा, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन, 'मुद्रा योजना' बनली लघु उद्योजकांचा मोठा आधार आणि पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने अनुकूल वाहतूकीवर आधारित 'फेम इंडिया' ही या अंकाची वैशिष्ट्ये बनली आहेत.

नेहमीप्रमाणे अंक वाचून आपल्या सूचना आम्हाला पाठवा...

आमचा पत्ता आहे :-
ब्युरो ऑफ आऊटरिच अँड कम्युनिकेशन,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली -110003
इमेल- response.nis@pib.gov.in

जयदीप भटनागर

(जयदीप भटनागर)




# आपले मनोगत

न्यू इंडिया समाचार हे एक कौतुकास्पद पाऊल आहे. या आवृत्तीत, भारतातील प्रत्येक क्षेत्रात होत असलेल्या विकासाचे विविध परिमाण इत्यंभूत सादर केले आहेत. विशेषतः ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील विकासकामांचा तपशील आकर्षक आहे. तरुणांना विकासकामांची पूर्ण जाणीव होण्यासाठी याच्या प्रती ग्रामीण भागांत विशेषत: शाळा व महाविद्यालयांना पाठवाव्यात. विद्यार्थ्यांसाठी हे खूप उपयुक्त ठरेल.

उपेंद्र साह shupendra@gmail.com

'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक केवळ चांगले नाही तर फारच चांगले आहे. त्याचा नवीन अंकही आवडला. माहिती सादरीकरणातही नावीन्य आहे. शक्तिशाली महिलांची कहाणी प्रेरणादायक आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे हा अंक केवळ हिंदी, इंग्रजीमध्येच नाही तर 11 भारतीय भाषांमध्येही उपलब्ध आहे आणि तो देखील विनामूल्य.

डॉ अजय कुमार ओझा
ajayojha60@gmail.com

न्यू इंडिया समाचारमध्ये सामान्य लोकांबद्दल माहिती असते हे पाहून मला खूप आनंद झाला. आपल्या देशात होत असलेल्या सर्व घडामोडींविषयीची माहिती या अंकाद्वारे सर्व लोकांपर्यंत सहज पोहोचते. यामध्ये देशातील सर्व घडामोडी साध्या व सोप्या शब्दात सांगितल्या जातात.

पुष्पां जलि कुमारी
pushpajha5555@gmail.com

लॅपटॉप, टॅब्लेट आणि मोबाईल या आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या युगात न्यू इंडिया समाचारचे प्रकाशन रोमांचकारी आहे. तसेच शासनामार्फत करण्यात येत असलेल्या विकासकामांची माहितीही विनामुल्य प्राप्त होत आहे. सर्व प्रती संग्रहित करणे आवश्यक आहे.

मुहम्मद असलम जिया
mohd.aslam31875@gmail.com

न्यू इंडिया समाचार हा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. त्याची यशोगाथा लोकांना प्रेरित करुन पुढे जाण्यास मदत करेल. तथापि, मला असे वाटते की जर या अंकात गावाकडील, गरीब वातावरणातील लोकांच्या यशोगाथांचा समावेश केला तर लोक जास्त प्रभावित होतील.

jamunadas621@gmail.com

मी न्यू इंडिया समाचारचा नियमित वाचक आहे. यामध्ये शासकीय धोरणे, योजना, शासनाने वेळोवेळी घेतलेल्या लोककल्याणकारी निर्णयांची माहिती उपलब्ध आहे. त्याचबरोबर हा अंक संपूर्ण ऊर्जावान, गतिशील भारताचा जणू काही आरसा आहे.

सुरेंद्र ठाकरे
surendragadh@gmail.com

न्यू इंडिया समाचार वाचून मन ताजेतवाने झाले, कारण आपण देशातील महिला शक्तींची ओळख करून दिली आहे. या व्यतिरिक्त आजारी मुलीच्या औषधावरील सहा कोटी रुपयांचे शुल्क माफ करुन सरकारने मोठे उदाहरण उभे केले आहे. प्रत्येक क्षेत्रात सरकारच्या पुढाकाराचे कौतुक केले पाहिजे.

बिर्ख खडका डुवर्सेली
birkhakd@gmail.com

मला अंक वाचून खूपच छान वाटले. या मासिकामध्ये समाविष्ट सर्व लेख अतिशय रंजक आणि तथ्यात्मक आहेत जे आपल्या सर्वांसाठी फायदेशीर ठरतील. महिला दिनानिमित्त छापील लेख खूप कौतुकास्पद व प्रशंसनीय आहेत.

nidhi.104754@gmail.com

न्यू इंडिया समाचारचा अंक खूपच सुंदर आहे. अखंड भारताच्या सर्व भागातील बातम्या नारी शक्तीचा जागर, कष्टकरी वर्गाचा सन्मान आणि भारताच्या आपत्ती व्यवस्थापन सामर्थ्यावर आधारित हा अंक उत्कृष्ट तसेच कौतुकास्पद आहे

sg7607779@gmail.com

## आता डिजिटल दिनदर्शिका




भारत सरकारने प्रथमच डिजिटल दिनदर्शिका आणि डायरी ॲप सुरु केले आहे. भारत सरकारच्या या ॲपवर शासकीय सर्व योजना, कार्यक्रम, प्रकाशने व अधिकृत सुट्टी व तारखा यांची माहिती मिळेल.

आपण ते गूगल प्ले स्टोअर आणि आयओएस वर डाउनलोड करू शकता.

गूगल प्ले स्टोअरची लिंक
https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.calendar

आयओएस लिंक
https://apps.apple.com/in/app/goi-calendar/id1546365594

https://goicalendar.gov.in/

# फक्त सीमाच नाही तर शहीदांच्या कुटुंबीयांची काळजी घेण्यात सीमा सुरक्षा दलाचा पुढाकार

ज्यांच्या शौर्यामुळे सीमा सुरक्षित आहेत; ते केवळ राष्ट्रासाठीच नव्हे तर आपल्या शहीद साथीदारांच्या कुटुंबियांसाठीसुद्धा सक्रिय आहेत. सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि राष्ट्रीय बाल संरक्षण अधिकार आयोगाने संयुक्तरित्या एक प्रशंसनीय प्रयत्न केला आहे. सशस्त्र सुरक्षा दलातील शहीद सैनिकांच्या मुलांना भावनिक, मानसिक व सामाजिक सहकार्य आणि समुपदेशन देण्याच्या उद्देशाने 'सहारा' (सपोर्टिव ॲक्शन विथ होलिस्टिक ॲप्रोच टू बिल्ड रेझिलिअन्स अमंग द चिल्ड्रन ऑफ़ आर्म्ड पोलिस फोर्स पर्सनल) मोहीम सुरू केली गेली आहे. विशेषत: शहीद सैनिकांच्या मुलांना समर्पित या प्रयत्नांतर्गत, बीएसएफच्या कल्याणकारी योजनांची माहिती देणे, भावनिक आधार, मानसिक सामाजिक समर्थन, आवश्यकता भासल्यास मुलांचे समुपदेशन करणे आणि बालकांच्या हक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित तक्रारींचा प्राधान्याने निपटारा करणे या गोष्टींचा अंतर्भाव आहे. यासाठी विशेषत्वाने एक टोल फ्री क्रमांक- 1800-0-236- 236 आणि वेबलिंक- https: /www.ncpcr.gov.in/ जारी करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या भारतीय लष्कराच्या माजी सैनिक संचालनालयाने (डीआयएव्ही) कर्तव्यावर असताना प्राण गमावलेल्या सैन्य दलाच्या जवानांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. त्या लष्करी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी बनविलेल्या विविध कल्याणकारी योजना सुलभ करणे हे यामागील उद्दीष्ट आहे. यामध्ये सैनिकांच्या मुलांसाठी आणि विधवांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती, संगणक सहाय्य, उच्च शिक्षणासाठी मदत आणि विवाहयोग्य मुलींसाठी देणगी समाविष्ट आहे. यामुळे 1 लाखाहून अधिक शहीद सैनिकांच्या विधवा आणि त्यांच्या मुलांना सन्माननीय जीवन जगण्यास मदत होईल.



# स्टॅचू ऑफ यूनिटी ला भेट देणाऱ्यांची संख्या 50 लाखांहून अधिक



लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सन्मानार्थ बनविण्यात आलेल्या जगातील सर्वात उंच पुतळा स्टॅच्यू ऑफ युनिटी ला 553 कार्य दिवसात 50 लाखांहून अधिक पर्यटकांनी भेट दिली. म्हणजेच दररोज सरासरी 9 ते 10 हजार लोकांनी स्टॅच्यू ऑफ युनिटीला भेट दिली. 15 मार्चपर्यंतच्या या आकडेवारीत देश- परदेशातून येणाऱ्या पर्यटकांचा सहभाग आहे. गुजरात मधील केवडीया इथे नर्मदेच्या काठावर असलेल्या 182 मीटर उंचीच्या या पुतळ्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 31 ऑक्टोबर 2018 रोजी राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने केले. 5 0 लाख पर्यटकांचा ऐतिहासिक आकडा पार केल्यावर हा ऐतिहासिक आणि अभिमानाचा क्षण असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी ट्विट केले आहे.



# उदबत्तीतून आत्मनिर्भरतेचा सुगंध

आत्मनिर्भर भारत मोहिमेअंतर्गत स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे उदबत्ती उद्योग. मेक इन इंडिया अंतर्गत स्थानिक उद्योगांना चालना देण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाद्वारे गेल्या वर्षी जुलैमध्ये उदबत्ती आत्मनिर्भर अभियानाची सुरुवात केली होती. याअंतर्गत महिला आणि ग्रामस्थांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देत देशात उदबत्ती उत्पादनास प्रोत्साहन दिले गेले. याचाच परिणाम म्हणून उदबत्त्यांच्या आयातीमध्ये अभूतपूर्व घट झाली आहे. एप्रिल 2020 ते जानेवारी 2021 या काळात उदबत्तीची आयात 93 टक्क्यांनी घटली. एप्रिल 2019 ते जानेवारी 2020 या काळात 284 कोटी रुपयांच्या उदबत्त्यांची आयात भारतात झाली होती. आता ती कमी होऊन अवघ्या 19 कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## यावर्षी पीएफवर 8.5% व्याजाची भेट

परिस्थिती कितीही कठीण असली तरी केंद्र सरकारने 6 कोटी कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कोणत्याही प्रकारची कपात न करता कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत जमा रकमेवर वर्ष 2021 मध्ये पुन्हा एकदा 8.5 टक्के व्याजाची भेट आणि मोठा दिलासा दिला आहे. प्रथमच, ईपीएफओने जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील ग्राहकांसाठी सामाजिक सुरक्षा वाढविली आहे. या विस्तारानंतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी- ईपीएफच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाची (सीबीटी) पहिली बैठक 4 मार्च रोजी श्रीनगर येथे आयोजित केली होती. त्यामध्ये व्याज दरावर निर्णय घेण्यात आला.

## पंतप्रधानांना सेरावीक जागतिक ऊर्जा आणि पर्यावरण नेतृत्व पुरस्कार

ही भारतासाठी केवळ चांगली नाही तर अभिमानाची बातमी आहे. परवडणारी ऊर्जा आणि पर्यावरणाच्या क्षेत्रात चांगल्या व्यवस्थापनासाठी उपाय आणि धोरणांद्वारे जागतिक वचनबद्धतेत महत्त्वपूर्ण पुढाकाराने नेतृत्व केल्याबद्दल आणि योगदानासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सेरावीक जागतिक ऊर्जा आणि पर्यावरण नेतृत्व पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सेरावीकची स्थापना 1983 मध्ये जगातील प्रमुख ऊर्जा मंच म्हणून केली गेली होती आणि 2017 मध्ये या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. भारत उर्जेच्या चांगल्या स्त्रोतांसाठी सातत्याने काम करत आहे आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे नेतृत्वही करत आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात पंतप्रधान म्हणाले, "मी सेरावीक जागतिक ऊर्जा आणि पर्यावरण नेतृत्व पुरस्कार अत्यंत नम्रतेने स्वीकारतो. हा पुरस्कार मी आपल्या महान देशातील जनतेला समर्पित करतो. पर्यावरणाला नेहमी मार्ग दाखविणाऱ्या या भूमीच्या उत्कृष्ट परंपरेला मी हा पुरस्कार समर्पित करतो."



कार्यक्रमाचा संपूर्ण व्हिडीओ
पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## आता ई-दाखिल पोर्टलद्वारे ग्राहकांचा मार्ग सुकर

ग्रामीण व शहरी ग्राहकांना सशक्त अधिकार देऊन ई-दाखिल पोर्टल मजबूत केले आहे. राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने (एनसीडीआरसी) या पोर्टलद्वारे ऑनलाइन तक्रारी नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) शी ते जोडण्यात आले आहे जेणेकरून ग्रामीण भागातील ग्राहक त्यांच्या ग्राहक हक्कांचा फायदा घेण्यासाठी सहजपणे याचा वापर करू शकतील. आयोगाने ते सध्या 15 राज्यात कार्यरत केले असून त्यात 444 ठिकाणांचा समावेश केला आहे. तर सर्व राज्यात अशाप्रकारचे पोर्टल सुरू करण्यासाठी केंद्रीय ग्राहक मंत्रालय प्रभावीपणे काम करीत आहे.

## कोरोना काळानंतर पहिल्यांदाच, एका दिवसात 3.13 लाख प्रवाशांनी केले उड्डाण

आता देश कोरोना महामारीतून सावरत सुरक्षेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून जनजीवन सामान्य करण्यात हातभार लावत आहे. त्याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे 28 फेब्रुवारी रोजी एका दिवसात विक्रमी 3.13 लाख प्रवाशांनी उड्डाण केले. 25 मार्च 2020 रोजी लावण्यात आलेल्या टाळेबंदीनंतर सर्व प्रकारच्या प्रवासी सेवा बंद झाल्या होत्या. 25 मे 2020 रोजी याची टप्प्याटप्प्याने सुरुवात करण्यात आली. त्यानंतर एकाच दिवसात प्रवास करणार्यांची ही सर्वाधिक संख्या आहे. या दिवशी, 2353 विमानांद्वारे 3,13,668 देशांतर्गत प्रवाशांनी प्रवास करण्यासाठी हवाई सेवेचा वापर केला. तर विमानतळावर 6 लाखाहून अधिक लोकांची ये-जा होती. ●





# पहिल्या स्वातंत्र्य लढ्याची भूमी

**प्राचीन काळापासून मध्ययुगीन कालखंडापर्यंतच्या भारताच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचे स्थान असलेले ओदिशा 1 एप्रिल रोजी आपला 86 वा स्थापना दिवस उत्कल दिन म्हणून साजरा करीत आहे. आपला इतिहास, संस्कृती बरोबरच भगवान जगन्नाथाची भूमी म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेले ओदिशा आपल्याला आणखी एका गोष्टीसाठीही माहित असले पाहिजे. 1817 सालचा पायका सशस्त्र संघर्ष, ज्याला प्रत्यक्षात भारतीय स्वातंत्र्य इतिहासाचा पहिला सशस्त्र संघर्ष म्हणतात --**

उत्तर प्रदेशमध्ये नुकतेच महाराजा सुहेलदेव स्मारकाचे उद्घाटन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, "भारताचा इतिहास हा फक्त तो नाही जो देशाला गुलाम बनवणाऱ्यांनी, गुलामगिरीच्या मानसिकतेमधून इतिहास लिहिणाऱ्यांनी लिहिला आहे. भारताचा इतिहास तोसुद्धा आहे जो भारतातील सामान्य जनतेत, भारतीय लोककथेत रचलेला, वसलेला आहे आणि जो पिढीजात समृद्ध होत गेला आहे." ओदिशाच्या संदर्भातही पंतप्रधानांचे हे विधान उचित आहे. सम्राट अशोकाच्या अहिंसेची शिकवण देणाऱ्या या उत्कल प्रदेशाला भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही महत्त्वपूर्ण स्थान आहे, कारण 1857 च्या स्वातंत्र्यलढ्याच्या 40 वर्षे आधी, ओदिशाच्या पवित्र भूमीवर 1817 मध्ये अशाच प्रकारचा एक सशस्त्र संघर्ष सुरू झाला होता ज्याने पूर्व भारतात इंग्रजांची पाळेमुळे उखडण्याचे काम केले होते.

**1 एप्रिल रोजी 86 व्या उत्कल दिनानिमित्त ओदिशाच्या पावन भूमिला अभिवादन**

पाईक किंवा पायका ही प्रत्यक्षात ओदिशातील गजपती राज्यकर्त्यांमधील एक असंघटित फौज होती जी युद्धाच्या काळात राजाला सैनिकी सेवा पुरवत होती आणि शांतता काळात शेती करत होती. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ओदिशाच्या उत्तरेकडील बंगाल प्रांताचा आणि दक्षिणेकडील मद्रास प्रांताचा ताबा घेतल्यानंतर 1803 मध्ये ओदिशाही ताब्यात घेतले. काही वर्षानंतर, गजपती राजांच्या असंघटित लष्करी तुकडीचे वंशज प्रमुख बक्षी जगबंधू यांच्या नेतृत्वात पाईक आंदोलनकर्त्यांनी आदिवासी आणि समाजातील इतर घटकांच्या सहकार्याने संघर्ष सुरू केला. पाईक बंडखोरी 1817 मध्ये सुरू झाली आणि खूप वेगाने पसरली. कोणत्याही अर्थाने ही बंडखोरी एखाद्या विशिष्ट वर्गातील लोकांच्या छोट्या गटाची बंडखोरी नव्हती. आदिवासी व समाजातील इतर घटकांनीही यात सक्रिय भूमिका बजावली होती. ब्रिटीशांनी पूर्ण ताकदीने ते बंड दडपले. अनेकांना आपला जीव गमवावा लागला. अनेक पाईक सेनानी 1819 पर्यंत गनिमी युद्ध लढले पण शेवटी त्यांना पकडून ठार मारण्यात आले. बक्षी जगबंधू यांना 1825 मध्ये अटक करण्यात आली आणि कैदेत असताना 1829 मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

ओदिशामधील या स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबियांचा सन्मान करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "हे दुर्दैव आहे की देशाच्या स्वातंत्र्याचा लढा काही कुटुंबांपर्यंत आणि काही उदाहरणापुरता मर्यादित ठेवला गेला; वास्तविक स्वातंत्र्यलढा ही एक लोकचळवळ होती. ही देशवासियांच्या बलिदानाची कहाणी होती." इतिहासाच्या या विसंगतीवर मात करण्यासाठी, पायका संघर्षाच्या 200 व्या स्मरण दिनानिमित्त केंद्र सरकारने शाळांच्या अभ्यासक्रमात तो शिकविण्याची घोषणा केली. सन 2019 मध्ये ओदिशाच्या खुर्दा जिल्ह्यातील ब्रनेई टेकडीच्या पायथ्याशी राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांनी त्यांच्या स्मारकाची पायाभरणी केली. ●

# बाबासाहेब, समतावादी समाजाचे प्रेरक

**मानवजातीच्या इतिहासामध्ये क्वचितच असे युग आले असेल जेव्हा कोणी त्याच्या तर्कशास्त्र, कर्म आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर तत्कालीन रुढी, श्रद्धा, जातीभेद आणि उच्च-नीच भेदभावावर जोरदार भाष्य केले नसेल. आज देश अशाच एका समाजसुधारक, संतुलित समाजाच्या निर्मितीत स्वत:ला समर्पित करणारे थोर नेते बाबासाहेब आंबेडकर, यांचे त्यांच्या 131 व्या जयंतीनिमित्त स्मरण करीत आहे. बाबासाहेब हे केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार नव्हते, तर संतुलित सामाजिक रचनेचे प्रेरक महामानव देखील होते ...**



बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी ब्रिटिश राजवटीतील भारताच्या मध्य भारत प्रांतात (आता मध्य प्रदेश) महू नगर सैन्य छावणीत झाला. रामजी मालोजी सकपाळ आणि भीमाबाई यांचे ते 14 वे आणि शेवटचे अपत्य होते. बालपणात गरीबी आणि सामाजिक गैरप्रकारांमुळे त्यांचे आयुष्य वंचित राहिले. बाल भीमाला आपल्या जातीमुळे सामाजिक प्रतिकार सहन करावा लागला.

अभ्यास करण्यास सक्षम असूनही, विद्यार्थी भीमराव यांना स्पृश्यास्पृश्यतेमुळे अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागले. 7 नोव्हेंबर 1900 रोजी रामजी सकपाळ यांनी सातारा येथील शासकीय हायस्कूलमध्ये आपल्या मुलाचे, भीमरावचे नाव भिवा रामजी आंबडवेकर असे नोंदविले होते. त्यांचे बालपणीचे नाव 'भिवा' होते. आंबेडकर यांचे मूळ आडनाव सकपाळ ऐवजी त्यांच्या आंबडवे गावाशी निगडित आंबडवेकर लिहिले गेले होते. कारण कोकण प्रांतातील लोक त्यांचे आडनाव गावाच्या नावावरून ठेवत असत. त्यांच्यावर विशेष आपुलकी असणारे ब्राह्मण शिक्षक कृष्णा महादेव आंबेडकर यांनी त्यांच्या नावातून आंबडवेकर काढून आपले साधे 'आंबेडकर' आडनाव जोडले. तेव्हापासून आजतागायत ते आंबेडकर म्हणून ओळखले जातात.

**भारतरत्न आणि संविधानाचे शिल्पकार बाबासाहेबांना 131 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन**

1907 मध्ये त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली आणि पुढच्याच वर्षी त्यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित एलफिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. या दर्जाचे शिक्षण घेणारे त्यांच्या समाजातील ते पहिले व्यक्ती होते. यानंतर ते उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. स्वातंत्र्यापूर्वी 1943 मध्ये बाबासाहेब आंबेडकर यांना व्हॉईसरॉय कौन्सिलमध्ये समाविष्ट करून कामगार मंत्री केले गेले. सार्वजनिक बांधकाम विभाग सुद्धा त्यांच्याकडे होता. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कंत्राट मिळविण्यासाठी ठेकेदारांमध्ये स्पर्धा असे. त्याच लोभात एका मोठ्या ठेकेदाराने आपला मुलगा, बाबासाहेबांचा मुलगा यशवंत राव यांच्याकडे पाठविला आणि बाबासाहेबांमार्फत कंत्राट मिळवून दिल्यास आपला भागीदार बनविण्याचा आणि 25 ते 50% पर्यंत कमिशन देण्याचा प्रस्ताव दिला. यशवंतरावांनी बाबासाहेबांना ही गोष्ट सांगितल्यावर त्यांचा राग अनावर झाला. ते म्हणाले- "मी केवळ समाजाच्या उद्धाराच्या उद्दीष्टाने येथे आलो आहे. स्वतःच्या मुलाचे पोषण करण्यासाठी नाही. असे लांगुलचालन मला माझ्या ध्येयापासून विचलित करू शकत नाही." जेव्हा 15 ऑगस्ट, 1947 रोजी भारताच्या स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वात पहिले नवीन सरकार स्थापन झाले तेव्हा डॉ. आंबेडकर यांना देशाचे पहिले कायदे मंत्री म्हणून नियुक्त केले गेले. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. आंबेडकर यांना स्वतंत्र भारताची नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले गेले. डॉ. आंबेडकर हे वास्तविक समान नागरिक संहितेच्या बाजूने होते आणि काश्मिरच्या बाबतीत कलम 370 ला विरोध दर्शवत होते. डॉ. आंबेडकर मधुमेहाने ग्रस्त होते. 6 डिसेंबर 1956 रोजी दिल्लीत त्यांचे निधन झाले. 1990 मध्ये त्यांना मरणोत्तर सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्नने सन्मानित करण्यात आले. ●



# स्वातंत्र्याचा 75 वा वर्धापन दिन, शताब्दी वर्षाचा संकल्प


## ॥ उत्सवेन बिना यस्मात् स्थापनम् निष्फलम् भवेत् ॥

**अर्थात, कोणतेही प्रयत्न, कोणताही निर्धार, उत्सवाशिवाय यशस्वी होत नाही. जेव्हा संकल्प उत्सवाचे रूप धारण करतो तेव्हा त्यात लाखो, कोट्यवधी संकल्प जोडले जातात. या भावनेने 137 कोटी देशवासियांसह भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव 7 5 आठवड्यांपूर्वी 12 मार्च रोजी दांडी यात्रेच्या 91 व्या वर्धापनदिनापासून सुरु झाला आहे. हा कार्यक्रम जगासमोर आपल्या 7 5 वर्षातील कर्तृत्वाचे प्रदर्शन करण्याची संधी असेल आणि पुढील 2 5 वर्षांसाठी आम्हाला संकल्पांची एक रूपरेषा देखील प्रदान करेल---**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे स्वातंत्र्याच्या उर्जेचे अमृत. स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रेरणेचे अमृत. नवीन कल्पनांचे आणि नवीन संकल्पांचे अमृत, आत्मनिर्भरतेचे अमृत. या विचारसरणीने, आपला गौरवशाली इतिहास आणि विकासाच्या प्रवासाची जोड देऊन स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षात (अमृत महोत्सव) प्रवेश करणारे राष्ट्र, 2047 अर्थात शताब्दी वर्षाच्या आत्मनिर्भरतेचा संकल्प घेऊन वाटचाल करण्यास सज्ज आहे. याची सुरुवात 12 मार्च या दांडी यात्रेच्या ऐतिहासिक तारखेपासून झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा झेंडा दाखवून साबरमती आश्रमातून पदयात्रेला रवाना केले, त्यानंतर देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू झाला.

भारत अमृत महोत्सव
हर राह पर बढ़ते कदम

# अमृत महोत्सवाचे पाच स्तंभ




हा कार्यक्रम या 7 5 वर्षातील आपल्या कर्तृत्वाला जगासमोर ठेवेल आणि पुढील 25 वर्षासाठीची रूपरेषा, एक संकल्प सुद्धा देईल, कारण 2047 मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याचे शतक साजरे करेल तेव्हा आपण कुठे असू, जगात आपले स्थान काय असेल, आपण भारताला कोणत्या टप्प्यावर नेणार आहोत, स्वातंत्र्याची ही 75 वर्षे आणि स्वातंत्र्यलढा आपल्याला प्रेरणा देईल. एक पृष्ठभूमी तयार करेल आणि त्या पृष्ठभूमीच्या आधारे, हा 75 वर्षांचा उत्सव आपल्यासाठी भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षासाठी, त्या दिशेने बलवान होण्यासाठी आमच्यासाठी दिशादर्शक, प्रेरक आणि पुरुषार्थाची भावना जागृत करणारा ठरावा.

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचे पूर्ण भाषण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

## अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम

- अमृत महोत्सव विषयाच्या अनुषंगाने ठरवलेल्या कार्यक्रमांचे उदघाटन होईल. यात चित्रपट, संकेतस्थळ, गायन, आत्मनिर्भर चरखा आणि आत्मनिर्भर इन्क्यूबेटर यांचा समावेश आहे.
- या कार्यक्रमांबरोबरच देशाची अदम्य भावना दर्शविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केले जाईल. यामध्ये संगीत, नृत्य, प्रवचन, प्रस्तावना वाचन (देशातील वेगवेगळ्या प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वेगवेगळ्या भाषांमधील प्रत्येक ओळ) समाविष्ट आहे. युवाशक्ती ही भारताचे भविष्य असल्याचे दर्शवत गायकवृंदात 75 स्वरांबरोबरच 75 नर्तक असतील.

यावेळी पंतप्रधानांनी 75 वर्षांच्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित विचार, 75 वर्षातील कामगिरी, 75 वर्षातील कार्यवाही आणि संकल्प यामुळे देशाला पुढे जाण्यास प्रेरणा मिळेल, असा संदेश दिला. गेली सहा वर्षे देशातील अपरिचित कर्तृत्ववान व्यक्तींचा इतिहास जपण्याच्या सरकारच्या पुढाकाराचा उल्लेख करीत त्यांनी ते तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. पंतप्रधानांनी कला-साहित्य, नाट्य जगत, चित्रपट उद्योग आणि डिजिटल करमणुकीशी संबंधित लोकांना देशाच्या भूतकाळाच्या अद्वितीय कथांचा शोध घेऊन त्या साकार करण्याचे आवाहन केले.

### 259 सदस्यांची समिती रूपरेषा बनवत आहे.

केंद्र सरकारने स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्धापनदिनानिमित्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर अमृत महोत्सव म्हणजेच असा उत्सव म्हणून साजरा करण्याची रूपरेषा तयार केली आहे ज्यात स्वातंत्र्यलढ्याची भावना, शहीदांना श्रद्धांजली आणि भारत घडविण्याच्या प्रतिज्ञेचा समावेश असेल. यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली 259 सदस्यांची राष्ट्रीय समिती गठीत करण्यात आली असून त्यात माजी राष्ट्रपती, समाजातील सर्व क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय अंमलबजावणी समिती

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी प्रदर्शनाला देशभरात सुरुवात









- अमृत महोत्सवाअंतर्गत ब्यूरो ऑफ आउटरीच अँड कम्युनिकेशनने दिल्लीशिवाय इतर 6 ठिकाणी फोटो प्रदर्शन सुरू केले आहे. त्याचे उदघाटन केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते 13 मार्च रोजी दिल्लीतील राष्ट्रीय माध्यम केंद्रात करण्यात आले.
- हे प्रदर्शन दिल्लीत तसेच जम्मू-काश्मीरमधील सांबा, कर्नाटकमधील बंगळुरू, महाराष्ट्रातील पुणे, ओदिशामधील भुवनेश्वर, मणिपूरमधील बिष्णूपूर जिल्ह्यातील मोरंग आणि बिहारमधील पाटणा येथे आयोजित करण्यात आले आहे.
- प्रदर्शनांमधील चित्रांच्या माध्यमातून आपल्या स्वातंत्र्यलढ्याशी आणि त्यामध्ये सहभागी झालेल्या लोकांशी संबंधीत काही संस्मरणीय क्षण सादर करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.
- या प्रदर्शनांची डिजिटल आवृत्ती तयार केली जात असून 15 ऑगस्टपूर्वी ही सुरू होण्याची अपेक्षा आहे.

**स्वातंत्र्यानंतर आपण आजवर किती प्रगती केली आहे आणि पुढच्या 25 वर्षांत आपल्याला काय साध्य करायचे आहे हे सांगण्यासाठी देशासमोर हा एक महत्वाचा क्षण आहे. निश्चितपणे ही प्रदर्शने याविषयी भाष्य करतात. प्रचंड किंमत मोजल्यानंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि या बलिदानांमागील कथांचे वर्णन या प्रदर्शनातून होते.**

**-प्रकाश जावडेकर, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री**

आणि विविध मंत्रालयांच्या सचिवांची समिती आधीच कार्यरत आहे.

## असा साजरा होईल महोत्सव

स्वातंत्र्याची 75 वर्षे साजरी करण्याच्या तयारीसाठी गठीत केलेल्या राष्ट्रीय समितीच्या पहिल्या सभेला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की या उत्सवामध्ये सनातन भारताचा गौरव आणि आधुनिक भारताची चमक प्रतिबिंबित झाली पाहिजे. हा कार्यक्रम म्हणजे देशाची 75 वर्षातील कामगिरी जगासमोर दाखवण्याची संधी आहे आणि पुढील 25 वर्षांसाठी तो आम्हाला संकल्पांची एक रूपरेषा देखील प्रदान करेल. भारत सरकारद्वारे आयोजित कार्यक्रमांची ही मालिका असून, लोकसहभागाच्या भावनेने हा लोकोत्सव म्हणून साजरा केला जात आहे. याची सुरुवात 12 मार्च रोजी साबरमती आश्रमातून झाली आहे. इंडिया @ 75 समारंभासाठी इतर विविध सांस्कृतिक आणि डिजिटल उपक्रमही या प्रसंगी सुरु करण्यात आले. हे कार्यक्रम 15 ऑगस्ट 2022 च्या 75 आठवड्यांपूर्वी आयोजित केले जात आहेत जे 15 ऑगस्ट 2023 पर्यंत चालतील. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवासाठी INDIA75@NIC.IN हे संकेतस्थळ देखील सुरू करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर पुढील 75 आठवड्यात होणाऱ्या 75 कार्यक्रमांची यादी देण्यात आली आहे.●



# 2030 पर्यंत सागरी क्षेत्रांच्या विकासाच्या दिशेने भारताची आश्वासक वाटचाल

**2014 नंतर प्रमुख बंदरांच्या क्षमतेत वार्षिक दुप्पट वाढ झाली आहे. अशा वेळी मेरीटाईम इंडिया व्हिजन - 2030 तयार करून भारत आता जागतिक स्पर्धेत पुढे येत अग्रणी नील अर्थव्यवस्थेसाठी स्वतःला करत आहे तयार. 2 ते 4 मार्च दरम्यान मेरीटाईम इंडिया समिट 2021 चे आयोजन करण्यात आले. ज्याचा उद्देश पुढील दशकासाठी भारताच्या सागरी क्षेत्रासाठी एक पथदर्शक आराखडा तयार करणे हा होता**

.भारत सागरी क्षेत्रांमध्ये पुढे जाण्यासाठी आणि जगातील अव्वल नील अर्थव्यवस्था म्हणून उदयास येण्याच्या बाबतीत खूप गंभीर आहे. मी जगाला भारतात येण्यासाठी आणि आमच्या विकासाच्या मार्गाचा एक भाग बनण्यासाठी आमंत्रित करतो... मेरीटाईम इंडिया शिखर परिषदेच्या उदघाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे शब्द सागरी किनारपट्टीचा विकास करून तिला आत्मनिर्भर भारताचे माध्यम बनवण्याचा एक दृष्टिकोन आहे. ज्यासाठी भारताने “मेरीटाईम व्हिजन - 2030” (म्हणजे समुद्राजवळच्या परिसराच्या विकासाची दीर्घकालीन योजना) तयार केली आहे. या शिखर परिषदेत अनेक देशांच्या वक्त्यांनी भाग घेतला आणि भारतीय सागरी क्षेत्रातील संभाव्य व्यापार संधी आणि गुंतवणुकीबाबत चर्चा केली. या तीन दिवसीय शिखर परिषदेत डेन्मार्क देखील भागीदार देश म्हणून सहभागी होता. 7.5 हजार किमी पेक्षा अधिक लांब सागरी किनारपट्टी बरोबरच बंदरे विकसित करणे हे भारताचे धोरण आहे. यासाठी सागरमाला प्रकल्पाअंतर्गत 6 लाख कोटी रुपये खर्चून 574 प्रकल्पांची आखणी करण्यात आली आहे, ज्यावर 2035 पर्यंत काम चालेल. या क्षेत्रासाठी मेरीटाईम इंडिया विजन 2030 हे सरकारचे प्राधान्य असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. ते म्हणाले की देशांतर्गत जलमार्ग माल वाहतुकीचे किफायतशीर आणि पर्यावरण स्नेही साधन आहे , आम्ही 2030 पर्यंत 23 जलमार्ग सुरु करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

## मेरीटाइम इंडिया व्हिजन - 2030

| | |
|---|---|
| **03** लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक | **20** लाखांहून अधिक नवीन नोकरीच्या संधी |
| **20** हजार कोटी रुपये महसूल क्षमता अनलॉक करणे | सव्वा लाख कोटी रुपये गुंतवणुकीसह बंदरांचा पायाभूत विकास वाढवण्याची योजना |

- 80 हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीसह गुजरात, महाराष्ट्र आणि ओडिशा-प. बंगाल क्लस्टर क्षेत्रात मेगा क्षमतेचे बंदर विकसित करणे
- विझिंगम बंदराचे परिचालन आणि ट्रांसशिपमेंट क्षेत्राच्या विकासाद्वारे 2030 पर्यंत भारतीय कार्गोच्या एका जहाजावरुन दुसऱ्या जहाजावर चढवण्याच्या कामाची (ट्रांसशिपमेंट) विद्यमान क्षमता 25 टक्क्यांवरून वाढवून 75 टक्के केली जाईल.
- 2030 पर्यंत नवीकरणीय उर्जेचा वाटा विद्यमान 10 टक्क्यांवरून 60 टक्क्यांपेक्षा अधिक करण्यासाठी शाश्वत बंदरे विकसित करणे . 2022 पर्यंत अपघाताशिवाय बंदरावर पोहचण्याचे लक्ष्य .
- 2030 पर्यंत एक आघाडीचे जहाज बांधणी करणारे राष्ट्र बनणे. सागरी क्षेत्राच्या हितधारकांसाठी कमी खर्चिक, दीर्घकालीन वित्तपुरवठ्यासाठी एक मेरीटाईम विकास निधि स्थापन करणे
- खासगी क्षेत्राच्या भागीदारीत सुधारणा करणे आणि 2020 च्या 51 टक्क्यांच्या तुलनेत 85 टक्क्यांहून अधिक कार्गो व्यवस्थापन करणे. फेरी आणि रोरो टर्मिनलचा विकास आणि परिचालनात खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे.

आवरण कथा
वास्तवदर्शी अर्थसंकल्प

# राष्ट्र उभारणीचा नवीन मार्ग









**कोरोना महामारीने जीवन शैली आणि अर्थव्यवस्था प्रभावित केली तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला आत्मनिर्भरतेच्या मार्गावर नेण्याचा संकल्प सगळ्यांसमोर मांडला, एवढेच नाही तर पठडीबाहेर जाऊन सर्वसामान्य अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा दिली. हा पंतप्रधानांचे विचार आणि ते अंमलात आणण्याच्या धोरणाचाच परिणाम आहे की 70 वर्षांच्या संसदीय इतिहासात प्रथमच पंतप्रधान देशाचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक क्षेत्राच्या तज्ञांशी थेट संवाद साधत आहेत, ज्यातून त्यांचे प्रामाणिक विचार दिसून येतात जेणेकरून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न होईल साकार...**






**"देशातील उद्योग-व्यापाराला पूर्ण समर्थन देणे ही सरकारची जबाबदारी आहे. सरकार स्वत: उपक्रम चालवेल आणि मालक राहील, हे आजच्या युगात शक्य नाही. म्हणूनच सरकारचे काम व्यापार करणे हे नाहीच कारण जेव्हा सरकार व्यापार करायला लागते तेव्हा अनेक प्रकारे नुकसानच होते. सरकारचा भर लोक कल्याण आणि विकासाशी संबंधित प्रकल्पांवरच रहायला हवा."**

अलिकडेच गुंतवणूकदारांशी संबंधित एका बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या शब्दांसह देशाच्या विकासाचा पथदर्शक आराखडा आणि त्यावरील आपली कल्पना सर्वासमोर मांडली. त्यांचे हे शब्द हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की आता सरकारच्या कार्यशैलीत खासगी क्षेत्र देखील विश्वासाने काम करेल जेणेकरून शेवटच्या घटकापर्यंत योजना आणि घोषणा कालबद्ध रीतीने पोहचणे सुनिश्चित होऊ शकेल. एक काळ होता जेव्हा देशात अर्थसंकल्प तयार करणे आणि तो सादर केल्यानंतर लोक विसरून जायचे. देशाच्या इतिहासात असे प्रथमच घडले आहे जेव्हा सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडणे हे केवळ वेतन वाटप आणि निवडक योजनांद्वारे लोकांना लाभ मिळवून देण्याची औपचारिकता नाही तर कोरोना काळानंतर देशाच्या गरजा आणि अपार क्षमता यांना नवा अर्थ देण्याचा मार्ग बनवण्यात आले आहे. अशात पठडीबाहेर जाऊन सादर करण्यात आलेला हा यावर्षीचा सर्वसाधारण अर्थसंकल्प भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्ष (2047) पर्यंतचे व्हिजन दस्तावेज म्हणून उदयाला आले आहे. त्याच्या केंद्रस्थानी सरकार नाही तर देशाचा प्रत्येक आम नागरिक भागीदार आहे. हेच स्वप्न पृथ्वीतलावर साकारण्याचा दिशेने शीर्ष नेतृत्व म्हणजेच पंतप्रधान स्तरावरूनच प्रथमच एक नवीन सुरुवात केली गेली आहे जी उद्योग जगताबरोबर समन्वय साधताना जनतेच्या आकांक्षांबरोबरच देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी भरारी देऊ शकते. पंतप्रधानांनी आतापर्यंत 9 पेक्षा अधिक क्षेत्रातील विशेषज्ञ, प्रतिनिधी, सल्लागार, वित्तीय संस्थांशी वेबिनारच्या माध्यमातून थेट संवाद साधला आहे. तरतुदी अंमलात आणताना विविध क्षेत्रातील खासगी कंपन्यांना कसे भागीदार बनवता येईल आणि त्याला बरोबर घेऊन कशी रूपरेषा आखता येईल यावर चर्चा करणे हा यामागचा उद्देश होता. जर कोरोना काळात भारताच्या जागतिक प्रतिमेतील बदल पाहिला तर कोरोना विरुद्धच्या लढाईत विशिष्ट रुग्णालयांची निर्मिती असो किंवा मग वेंटीलेटर, एन-95 मास्क, पीपीई किट आणि शेवटी

## अर्थसंकल्प अंमलबजावणीबाबत उद्योग जगत आणि सरकार यांच्यात विश्वासाची नवी सुरुवात


**0.4%**

राहिला कोरोना काळात तिसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी विकास दर

**11%**

यावर्षी चालू वित्त वर्षात आर्थिक सर्वेक्षणानुसार जीडीपी विकास दर राहील असा अंदाज





**पंतप्रधान म्हणाले - भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी कोरोना काळातही आम्ही 5 लघु अर्थसंकल्प सादर केले, हा अर्थसंकल्प देखील अखेरचा नाही.**

लसीच्या उत्पादनापर्यंत भारताने नेतृत्व करण्यासाठी घेतलेला पुढाकार असो, सरकारने मार्गदर्शक आणि सहकार्याची भूमिका पार पाडली आहे. याचा परिणाम असा झाला की खासगी क्षेत्रातील उद्योजकांना विश्वास मिळाला आणि अशा प्रकारच्या वस्तूंच्या निर्मितीच्या माध्यमातून शून्यातून शिखरापर्यंत पोहचून जगात भारताने आपला दबदबा निर्माण केला आहे. या नवीन विश्वासाचा, या नव्या प्रतिमेचा आर्थिक उपयोग कसा करायचा, ही एक महत्वपूर्ण चिंता बनून राहिली आहे.

## नागरिक आणि खासगी क्षेत्र यांच्यात सरकार बनत आहे सेतु

स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्था तर सातत्याने वाढत राहिली, मात्र तिच्या पायाभूत स्तंभांचा योग्य विकास आणि समन्वय होऊ शकला नाही. आता त्यांच्यामध्ये समन्वय आणि सहभागासाठी पंतप्रधान 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या मंत्राच्या योग्य अंमलबजावणीसाठी कटिबद्ध आहेत. खासगी क्षेत्र, संपत्ती निर्माण करणाऱ्यांप्रति संशय घेण्याच्या भावनेवर एक परिणामकारक उपाययोजना करण्यात आली आहे, जी कंपनी कायदे, कामगार कायद्यांचे गैर गुन्हेगारीकरण, व्यवसाय सुलभता इत्यादींमध्ये स्पष्ट दिसून येते. सरकार विश्वासाच्या बाबतीत वास्तविक स्वरूपात पुढाकार घेत आहे. प्रथमच सरकारच्या सर्वोच्च नेतृत्व पातळीवर सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडण्याची औपचारिकता सीमित राहण्याऐवजी ते वास्तवात साकारण्याच्या जिद्दीसह काम सुरु झाले आहे. या चिकाटीमुळे खासगी उद्योजकांच्या दृष्टिकोनातही बदल दिसून येत आहे. पूर्वीच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात कॉर्पोरेट कर, सीमा शुल्क, कर रचनेत बदल इत्यादींवर करदात्यांपासून उद्योग जगतापर्यंत सर्वांच्या नजरा लागलेल्या असायच्या. मात्र आता सरकारने अशा प्रकारचा दृष्टिकोनच (अप्रोच) बदलून टाकला आहे. म्हणजे उद्योग जगताने काम केले आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांसह जगातील बाजारपेठांमध्ये आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न केला तर सरकार त्यांना प्रोत्साहन देईल, ज्यासाठी पीएलआय म्हणजे उत्पादन संलग्न प्रोत्साहनाची क्रांतिकारी सुरुवात केली आहे. यासाठी केंद्र सरकारकडून एक डझनहून अधिक क्षेत्रांमध्ये पीएलआयला मंजुरी देण्यात आली आहे. उद्योग जगताच्या दृष्टिकोनातील बदलाला कारणीभूत ठरलेल्या पीएलआयचा परिणाम असा झाला आहे की, कोरोना काळातही भारतात परदेशी गुंतवणूक विक्रमी पातळीवर पोहचली तर देशांतर्गत उद्योजकांमध्ये विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांनी (MSMEs) संधी ओळखल्या आणि सरकारने देखील त्यांना प्रोत्साहन देऊन नवीन मार्ग दाखवला आहे. उद्योग जगताच्या दृष्टिकोनातील बदलच आहे ज्यामध्ये कोरोना काळापासून निर्मिती क्षेत्रात घट दिसून येत होती आणि ते मदतीच्या आशेने प्रतीक्षा करत होते. मात्र संकट काळात सरकारने स्वीकारलेल्या धोरणांनी चित्रच पालटले आणि आज गाड्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत मोठी वाढ दिसत आहे. सिआमच्या आकडेवारीनुसार भारतात प्रवासी वाहनांची विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १८ टक्क्यांनी वाढली आहे. सरकारच्या या प्रयोगांचा परिणाम आहे की अर्थव्यवस्था देखील अपेक्षेपेक्षा खूप पुढे वाटचाल करत आहे. आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेचा (ओईसीडी) अंदाज आहे की, वित्त वर्ष 2022 मध्ये भारताचा जीडीपी 12.6 टक्के वाढेल. तर क्रिसिलच्या एका अहवालात म्हटले आहे की, केंद्र सरकारकडून पायाभूत विकासावर खर्च आणि पीएलआय प्रकल्प पुढे नेल्यामुळे २०२१-२२ मध्येअर्थव्यवस्था पुढे

# पीएलआय
## मोठी झेप घेण्याची तयारी



सर्वसाधारण अर्थसंकल्प आणि धोरण आखणी केवळ सरकारी प्रक्रिया बनून राहू नये, तर देशाच्या विकासाशी संबंधित सर्व सहभागींचा प्रभावी सहभाग देखील असावा. म्हणूनच सरकारी हस्तक्षेप कमी करत स्वनियमन, स्व-साक्षांकन, स्व-प्रमाणीकरण द्वारे नागरिकांवर भरवसा ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारकडून उत्पादन संलग्न प्रोत्साहन (पीएलआय)ची सुरुवात करण्यात आली आहे.

**1.97 लाख कोटी रुपयांना मंजुरी देण्यात आली आहे अर्थसंकल्पात पुढील 5 वर्षे 13 क्षेत्रांमधील पीएलआयसाठी**

- पूर्वी औद्योगिक प्रोत्साहन केवळ इनपुट आधारित मदत असायची. मात्र आता एक निश्चित लक्ष्य आणि स्पर्धा यासह 13 क्षेत्रांना प्रोत्साहन देण्याची व्यवस्था सरकारची वचनबद्धता दाखवते.
- अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, कृषी, आयटी, ऑटो आणि औषध निर्मिती मध्ये पीएलआयमुळे ऑटो पार्ट्स, वैद्यकीय उपकरण, औषधांसाठी लागणारा कच्चा माल याच्याशी संबंधित विदेशी अवलंबत्व कमी होईल.
- ऊर्जा क्षेत्राला आधुनिक बनवणे, देशाचे श्रम, कौशल्य आणि क्षमताच्या सहाय्याने एक उत्तुंग भरारी घेण्यासाठी मदत मिळेल. म्हणजे उत्पादनाच्या सरासरी 5 टक्के प्रोत्साहन म्हणून देण्यात आले आहेत, ज्यामुळे आगामी 5 वर्षात सुमारे 520 बिलियन डॉलरचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे.
- ज्या 13 क्षेत्रांमध्ये पीएलआय देण्यात आले आहे, त्यात काम करणाऱ्या लोकांची संख्या जवळपास दुप्पट होईल. यामुळे रोजगार निर्मिती तर होईलच, उत्पादन आणि निर्यात देखील वाढेल.
- एकट्या आयटी हार्डवेयरच्या बाबतीत आगामी 4 वर्षात सव्वा तीन ट्रिलियन रुपये उत्पादनाचा अंदाज आहे. स्थानिक पातळीवर देखील 20-25% योगदान वाढेल. टेलिकॉम उपकरण निर्मितीत 5 वर्षात सुमारे अडीच लाख कोटी तर फार्मा क्षेत्रात 3 लाख कोटी रुपये वाढीचा अंदाज आहे.

नेण्यात मदत मिळेल. अहवालानुसार पीएलआय योजना पुढील 5 वर्षात 35-40 ट्रिलियन रुपये वाढीव महसूल (इंक्रिमेंटल रेवेन्यू) उत्पन्न करू शकते. तर दुसरीकडे 'आत्मनिर्भर भारत अभियान' आणि 'व्होकल फॉर लोकल' आवाहनाने सामान्य नागरिकांचा देखील जीवनाप्रति दृष्टिकोन बदलून टाकला आहे. आज देश स्थानिक उत्पादनाकडे आशेने नाही तर विश्वासाच्या नजरेने पाहत ते स्वीकारण्यासाठी उत्सुक दिसत आहे.

राष्ट्राप्रति सामान्य लोकांच्या दृष्टिकोनात झालेल्या या बदलाचे कारण 'कमाल शासन आणि किमान सरकार' हा विचार आहे.

### सरकारी हस्तक्षेप कमी, जेणेकरून सगळे बनतील भागीदार

राष्ट्र निर्माणच्या बाबतीत विद्यमान सरकारचा दृष्टिकोन हा अर्थसंकल्पाला असे साधन बनवणे आहे, ज्यात सर्वांची भागीदारी महत्वाची असेल. कोणत्याही सर्वसाधारण अर्थसंकल्पापूर्वी सरकार सर्व हितधारकांशी विचार-विनिमय करते तेव्हा त्याचा उद्देश सूचना स्वीकारणे हा असतो, जेणेकरून अर्थसंकल्प तयार करण्यात मदत होते. आतापर्यन्त देशात 'अर्थसंकल्प -पूर्व चर्चेची' परंपरा होती. मात्र, प्रथमच सरकारने अर्थसंकल्पानंतर देखील सर्व हितधारकाना एकाच मंचावर आणून काम सुरु केले आहे, त्याचा उद्देश अर्थसंकल्पातील तरतुदींना 'समाधान' च्या दिशेने घेऊन जाणे हा आहे. सरकारच्या दृष्टिकोनात क्रांतिकारी परिवर्तन आणि लवचिकपणाची झलक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विधानात स्पष्टपणे दिसून येते. त्यांचे असे म्हणणे आहे की जेव्हा सरकार व्यापार करायला लागते तेव्हा त्याच्या संसाधनाची व्याप्ती सीमित होते. याचे मोठे कारण हे आहे की, सरकारच्या निर्णय प्रक्रियेत अनेक प्रकारची बंधने असतात आणि वाणिज्यिक निर्णय घेण्यात धाडसीपणाचा अभाव देखील असतो. यात कोर्ट-कचेरी -खटले याची भीती असते. अशा वेळी अधिकारी देखील असा विचार करायला लागतात की आपला नोकरीचा कार्यकाळ पूर्ण करू, बाकी जे चालू आहे, ते चालू राहू दे.

# ऊर्जा क्षेत्र

## चार 'R' बनले आधार

राष्ट्राच्या गति-प्रगति मध्ये ऊर्जा क्षेत्राची मोठी भूमिका आहे कारण यामध्ये जीवन आणि व्यवसाय सुलभता (ईज ऑफ लिविंग आणि ईज ऑफ डूइंग बिजनेस) दोन्हीचा समावेश आहे. अशा स्थितीत केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात पोहोच (Reach), बळकटीकरण (Reinforce), सुधारणा Reforms) आणि नवीकरणीय ऊर्जा (Renewable Energy) यांना मूलमंत्र बनवले आहे.



- या मंत्राच्या माध्यमातून सरकारने 21 व्या शतकात विजेशिवाय राहणाऱ्या गावे-घरापर्यंत वीज पोहचवण्यावर भर दिला तर आपली क्षमता वाढवत भारत अतिरिक्त वीज अर्थात पॉवर सरप्लस असलेला देश बनला
- यासाठी सुधारणांना गती देण्यात आली आणि उदय योजने अंतर्गत 2 लाख 32 हजार कोटी रुपयांचे रोखे जारी करण्यात आले. प्रथमच एखादे सरकार उर्जेला उद्योगाचा भाग नाही तर संपूर्ण क्षेत्र म्हणून पुढे नेत आहे
- आता नवीकरणीय उर्जेवर जगाचा भर आहे आणि भारताने देखील गेल्या 6 वर्षात आपली क्षमता अडीच पटीने वाढवली आहे. सौर उर्जेत भारताने 15 पटीने वाढ केली आहे आणि आज आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे नेतृत्व करत आहे.
- एक काळ होता जेव्हा देशात वापरले जाणारे 95% सोलर पैनल बाहेरून आयात केले जात होते. म्हणूनच पीएलआय योजने अंतर्गत 10 हजार मेगावॅट क्षमता असलेले एकीकृत सोलर पैनल बनवण्यावर सुमारे 14000 कोटी रुपयांची गुंतवणूक होईल.
- पीएम कुसुम योजनेच्या मदतीने 30 गीगावाट सौर ऊर्जा क्षमता साध्य करण्याचे लक्ष्य आहे तर पुढील दीड वर्षात 40 गिगावॅट सौर ऊर्जा केवळ छतावरील सौर प्रकल्पामधून साध्य करण्याची तयारी.

**2500**

**कोटी रुपये गुंतवणूक होईल यावर्षी सौर आणि नवीकरणीय उर्जेसाठी**

**पीएम कुसुम सारख्या योजनांच्या माध्यमातून अन्नदात्याला ऊर्जादाता बनवण्याचे उद्दिष्ट**

पंतप्रधान यात असेही म्हणतात की सरकारकडे उत्तम अधिकाऱ्यांची कमतरता नाही मात्र त्यांचे काम प्रशिक्षण व्यवस्था चालवणे, धोरण आखणी, लोक कल्याणवर भर देणे आणि त्यासाठी धोरण आखणे हे असते. या कामात त्यांना प्राविण्य देखील असते कारण आयुष्यात प्रदीर्घ काळ लोकांबरोबर काम करत ते इथवर पोहचलेले असतात. त्यामुळे जेव्हा सरकार एखादा व्यवसाय करते तेव्हा अशा हुशार अधिकाऱ्यांना दुसरीकडे घेऊन जावे लागते, जे अधिकाऱ्यांची पात्रता आणि सार्वजनिक उपक्रम यांच्याशी अन्याय आहे. याच विचारासह केंद्र सरकारचा प्रयत्न लोकांचा जीवन स्तर सुधारणे आणि त्यांच्या जीवनात सरकारचा विनाकारण हस्तक्षेप कमी करणे हा आहे. म्हणजे सरकार आता अशा धोरणावर काम करत आहे ज्यात जीवनात ना सरकारचा अभाव असेल, ना सरकारचा प्रभाव असेल. याच दृष्टिकोनासह सरकारने सर्वसाधारण अर्थसंकल्पाला राष्ट्र निर्माणाचे माध्यम बनवले आहे ज्याची सुरुवात 2016 मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका महत्वपूर्ण निर्णयाने झाली होती. जेव्हा अर्थसंकल्प मांडण्याची तारीख फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवसाऐवजी पहिल्या दिवशीची करण्यात आली होती.

# आरोग्य क्षेत्र
## नवा भरवसा बनला भारत



कोरोना पश्चात जगाचे लक्ष आता भारताच्या आरोग्य क्षेत्राकडे आहे. प्रथमच असे झाले आहे की एखाद्या सरकारने सर्वसाधारण अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राला 137 टक्के वाढीसह पहिला स्तंभ बनवला आहे. हे आरोग्य क्षेत्रासाठी केंद्र सरकारच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे. टीबी सारख्या जीवघेण्या आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी जेव्हा संपूर्ण जगाने 2030 पर्यंतची कालमर्यादा निश्चित केली होती तेव्हा भारताने तो 2025 च्या आतच समाप्त करण्याचा संकल्प निश्चित केला आहे.

**2,23,846 कोटी**

**रुपयांची तरतूद यावर्षी अर्थसंकल्पात आरोग्य आणि कल्याणासाठी केली आहे.**

- आरोग्य क्षेत्रात करण्यात आलेली गुंतवणूक रोजगाराच्या नव्या संधी देखील वाढवते. म्हणूनच केंद्र सरकारने या क्षेत्रात 4 आघाड्यांवर एकाच वेळी पुढे जाण्याबाबत वचनबद्धता दर्शवली आहे.
- एक, आजार प्राथमिक स्तरावरच रोखण्यासाठी स्वच्छतेला प्रोत्साहन, दोन-प्रभावी योजनेद्वारे गरीबांना स्वस्त आणि प्रभावी उपचार, तीन- पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा बरोबरच व्यावसायिकांची संख्या आणि गुणवत्ता यात वाढ आणि चार-आरोग्य क्षेत्राशी संबंधित समस्यांवर मिशन मोड मध्ये भर
- या चारही आघाड्यांवर विजयी होण्यासाठी वैद्यकीय उपकरणांपासून औषधे, व्हेंटिलेटर, लस आणि शोध यासह देखरेख प्रणाली पर्यंत संपूर्ण पायाभूत सुविधा उत्तम तऱ्हेने उभारण्यासाठी तयारी केली आहे.
- प्रधानमंत्री आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजनेच्या माध्यमातून चाचणीपासून उपचारापर्यंत एक नवी परिसंस्था तयार केली जाणार आहे.
- 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारसी स्वीकारण्यात आल्यास आरोग्य क्षेत्रात स्थानिक संस्थांना 70 हजार कोटीं रुपयांपेक्षा अधिक मिळतील.
- 41 औषधांसाठी एपीआय (कच्चा माल) देशात बनवण्यासाठी पीएलआय देण्याची सुरुवात केली आहे

**पंतप्रधान म्हणाले - आयुष्यात सरकारचा न अभाव असो, न प्रभाव असो. आता याच दिशेने काम.**

### अर्थसंकल्पीय सुधारणांमुळे बदलली देशाची दिशा

“मला देशाची अर्थव्यवस्था एक महिना आधी धावायला हवी आहे” अर्थसंकल्प सादर करण्याची परंपरा मोडून मोदी सरकारने क्रांतिकारी निर्णय घेतला. वर्ष 2017-18 पासून अर्थसंकल्प 28 फेब्रुवारी ऐवजी 1 फेब्रुवारी रोजी सादर केला जात आहे जेणेकरून तो आधीच संसदेत मंजूर केला जाऊ शकेल. पूर्वी असे व्हायचे की फेब्रुवारीच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी संसदेत अर्थसंकल्प सादर केला जायचा आणि तो मंजूर होता होता मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यापर्यंत विधायी प्रक्रिया सुरु राहायची, त्यामुळे अर्थसंकल्पातील मोठी रक्कम खर्च होऊ शकत नव्हती. एवढेच नाही, वित्त वर्षाच्या सुरुवातीच्या दोन महिन्याच्या खर्चासाठी सरकारला संसदेत लेखानुदान पारित करून घ्यावे लागत होते. या क्रांतिकारी सुधारणेच्या आधी वित्त वर्षाच्या प्रारंभिक तिमाहीत अर्थसंकल्पीय अंदाजाच्या सरासरी 24 टक्के खर्च व्हायचा जो सुधारणांनंतर वाढून 28 टक्क्यांवर पोहचला. अर्थसंकल्पीय सुधारणेच्या या उपायामुळे मंत्रालय आणि विभागांनाही वित्त वर्षाच्या सुरुवातीपासून संपूर्ण निधी उपलब्ध करून देण्यात मदत मिळायला लागली आहे. ज्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत संपूर्ण वर्ष तेजी राहते.

अर्थसंकल्पीय सुधारणांप्रति पंतप्रधानांचा दृष्टिकोन एकदम स्पष्ट आहे, ...

# संरक्षण क्षेत्र आत्मनिर्भरतेच्या दिशेने



गेल्या काही दिवसांपर्यंत तुम्ही एक बातमी अनेकदा वाचली किंवा ऐकली असेल की भारत जगात संरक्षण उत्पादनांचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. मात्र गेल्या वर्षी प्रथमच भारत जगातील अव्वल 25 निर्यातदारांमध्ये सामील झाला आहे. खरे तर संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीत भारताकडे एक प्रदीर्घ अनुभव आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर ही व्यवस्था मजबूत केली गेली नाही. भारत आता आपली संरक्षण उत्पादन क्षमता जलद गतीने वाढवण्यासाठी वचनबद्ध आहे.

## 4.78

**लाख कोटी रुपये आहे यंदाचा संरक्षण क्षेत्राचा अर्थसंकल्प, 2014 मध्ये तो 2.29 लाख कोटी रुपये होता**

- भारताने संरक्षण क्षेत्राशी संबंधित अशा 100 संरक्षण सामुग्रीची यादी तयार केली आहे ज्यांची स्थानिक उद्योगाच्या मदतीने निर्मिती केली जाऊ शकते.
- तेजस सारखे उन्नत लढाऊ विमान आज दिमाखात आकाशात झेपावत आहे. अलिकडेच तेजससाठी 48 हजार कोटी रुपयांची ऑर्डर मिळाली आहे. जगातील 100 पेक्षा अधिक देशांना आपण बुलेटप्रूफ जॅकेट पुरवत आहोत.
- मात्र खासगी क्षेत्राच्या भागीदारी शिवाय संरक्षण उत्पादनांच्या निर्मिती क्षेत्रात तशी परिसंस्था बनू शकत नाही जशी भारताला हवी आहे. म्हणूनच तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशात दोन संरक्षण कॉरीडोरसह 74 टक्के परदेशी गुंतवणूक, डी-लाइसेंसिंग, वि-नियमन आणि निर्यातीला चालना देण्यासारखे धोरण अवलंबण्यात आले आहे.
- प्रथमच भांडवली खर्चात 19 टक्के वाढ करण्यात आली आहे. तर चीफ ऑफ डिफेंस स्टाफ सारखे महत्वपूर्ण पद निर्माण केल्यामुळे ट्रायल, टेस्टिंग आणि खरेदीच्या प्रक्रियेत आता एकरूपता आली आहे.
- संरक्षण उत्पादन क्षेत्रात एमएसएमईला अधिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याच बरोबर संशोधन आणि रचना यामध्ये अभिनवतेसाठी या क्षेत्रात स्टार्टअपना देखील प्रोत्साहन दिले जात आहे.

**2016 ते 2020 दरम्यान भारताच्या शस्त्रास्त्रे आयातीत 33 टक्के घट झाली आहे.**

"असे झाले असते तर बरे झाले असते, हे केले असते तर ठीक असते, हा काळ आता लोटला आहे. आणि जे आहे त्याला आपल्याला जलद गतीने लागू करायचे आहे. आता आम्ही अर्थसंकल्प एक महिना अलिकडे आणला आहे. एक महिना आधी करण्याचा अर्थ आहे मला देशाची आर्थिक व्यवस्था एक महिना आधी धावायला हवी आहे. " अर्थसंकल्पातील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत हितधारकांबरोबर संवादाच्या मालिकेत पंतप्रधानांनी आपले हे मत जाहीर देखील केले होते. पूर्वीच्या काळी जेव्हा अर्थसंकल्प लागू व्हायचा तेव्हा मे महिना पूर्ण निघून जायचा आणि त्याच वेळी पाऊस सुरु व्हायचा ज्यामुळे जुलै -ऑगस्ट -सप्टेंबर पर्यंत पायाभूत विकासाशी संबंधित सर्व योजनांचे काम बंद पडायचे. कारण एप्रिल ते जून पर्यंतचा वेळ पायाभूत विकासाच्या दृष्टीने खूप महत्वाचा असतो. अशा वेळी अर्थसंकल्पाची तारीख एक महिना अलिकडे केल्यामुळे एप्रिल ते जून पर्यंतच्या तीन महिन्यांचा उपयोग करून जलद गतीने पुढे वाटचाल करण्याच्या दिशेने काम सुरु आहे. सरकारचा दृष्टिकोन असा आहे की जेव्हा एक एप्रिल पासून नवीन अर्थसंकल्प लागू होईल, तेव्हा त्याच दिवसापासून सर्व योजना देखील पुढे जायला हव्यात आणि फेब्रुवारी -मार्च याच्या तयारीसाठी वापरायचा. सरकारच्या याच तयारीचा परिणाम आहे की, संकट काळानंतर आलेला ऐतिहासिक अर्थसंकल्प 'नवीन भारताचा' पाया मजबूत करणे

# शिक्षण क्षेत्र

## नवसंशोधन, संशोधन, कौशल्य



नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून केंद्र सरकारने शिक्षण क्षेत्राची संपूर्ण परिसंस्था बदलण्याची सुरुवात केली आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पात आरोग्यानंतर जो दुसरा सर्वात मोठा भर दिला गेला आहे तो शिक्षण, संशोधन आणि नावीन्यतेवर आहे. शिक्षणाबरोबर कौशल्य विकासाची सांगड घालण्यासाठी महत्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत.

**93,223.65**

**कोटी रुपयांची तरतूद यावर्षी शिक्षण क्षेत्रासाठी करण्यात आली आहे**


- प्रथमच देशातील शाळांमध्ये अटल टिंकरिंग लैब पासून उच्च संस्थामध्ये अटल इन्क्यूबेशन सेंटर पर्यंत भर दिला जात आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी 50 हजार कोटी रुपयांच्या मदतीने राष्ट्रीय संशोधन संस्थेची सुरुवात केली जात आहे.
- देशात स्टार्ट अपसाठी हेकेथॉनची नवीन परंपरा बनली आहे, जी देशाचे युवक आणि उद्योग या दोघांसाठी खूप मोठी ताकद बनत आहे. ज्ञान, संशोधन यांना सीमित ठेवणे म्हणजे देशाच्या सामर्थ्याबरोबर खूप मोठा अन्याय आहे. याच विचारांसह अंतराळ असेल, अणुऊर्जा असेल, डीआरडीओ असेल, कृषि असेल, अशा अनेक क्षेत्रांचे दरवाजे आपल्या प्रतिभाशाली युवकांसाठी उघडले जात आहेत.
- अंतराळ विज्ञान आणि जियो स्पेशियल डेटा या क्षेत्रात सुधारणांमुळे भारतीय स्टार्टअप आणि संशोधकांना नवसंशोधनासाठी नवा मार्ग दाखवला आहे. आता जैव-तंत्रज्ञान क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.
- भारताने हाइड्रोजन वाहनाची चाचणी केली आहे. आता हाइड्रोजन वाहतुकीसाठी इंधन म्हणून वापरण्यासाठी आणि यासाठी स्वतःला सज्ज (इंडस्ट्री रेडी) ठेवण्यासाठी आता आपल्याला एकत्रितपणे पुढे जावेच लागेल. शिक्षणात आता संशोधन, नवसंशोधन आणि कौशल्य विकास यावर भर आहे.

**कोरोना संकटानंतर एक राष्ट्र म्हणून भारतासमोर आत्मनिर्भरतेच्या मार्गावर अभूतपूर्व संधी**

आणि भारताला आर्थिक महाशक्ति म्हणून उदयाला आणण्याचे व्हिजन दस्तावेज बनून समोर येत आहे.

### सर्वसाधारण अर्थसंकल्पाने सांगितला देशाचा स्वभाव

यावर्षीच्या अर्थसंकल्पावर ज्याप्रकारे सकारात्मक प्रतिक्रिया आली आहे, तिला पंतप्रधानांनी 'मूड ऑफ द नेशन' म्हणजे देशाचा स्वभाव आणि चोहोबाजूला एक नवीन आशेचे वातावरण निर्माण करणारे पाऊल म्हटले आहे. त्यांचे म्हणणे आहे की देशाचे मन बनवण्यात देशाचे 'युवा मन' खूप मोठी भूमिका पार पाडत आहे आणि त्यामुळेच बदलांप्रति एक नवीन आकर्षण निर्माण झाले आहे. अशा वेळी एक राष्ट्र म्हणून अभूतपूर्व संधी भारतासमोर उभ्या आहेत आणि सरकार ही संधी गमावू इच्छित नाही, म्हणूनच सर्वांच्या भागीदारी बरोबर सरकारचा प्रमुख या नात्याने प्रथमच एखाद्या पंतप्रधानांनी स्वतः सर्व क्षेत्रांशी संबंधित उद्योजक-तज्ञ आणि हितधारकांबरोबर संवादाची मालिका सुरु केली आहे जेणेकरून उद्योग-व्यापारात येणाऱ्या अडचणी दूर करून सर्वसाधारण अर्थसंकल्पाला शंभर टक्के मूर्त रूप देऊन भारताला आत्मनिर्भर बनवता येईल. सर्व क्षेत्रातील प्रतिनिधींबरोबर संवादाचा उद्देश हाच आहे की प्रत्येक क्षेत्र यावर्षीच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पाच्या गंभीरतेला जवळून



> असे झाले असते तर बरे झाले असते, हे केले असते तर ठीक असते, हा काळ आता लोटला आहे. आणि जे आहे त्याला आपल्याला जलद गतीने लागू करायचे आहे.
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

पाहील आणि ती सर्व क्षेत्र एकजुटतेने अंतिम व्यक्ति पर्यंत त्याची आपूर्ति सुनिश्चित करण्यात सहभागी होतील. एक फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर होण्याच्या पंधरवड्यानंतर 16 फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या संवाद मालिकेत पंतप्रधानानी स्पष्टपणे निर्गुंतवणूकीचे समर्थन करत पायाभूत सुविधा, ऊर्जा, वित्तीय संसाधने गोळा करणे, आरोग्य सुविधांची गरज, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, मुद्रीकरण, वित्तीय सेवा, कृषी आणि शेतकरी, शिक्षण क्षेत्र आणि उद्योगाना प्रोत्साहन देणाऱ्या पीएलआयशी संबंधित विषयांवर वेबिनारच्या माध्यमातून भविष्याच्या रुपरेषेबाबत चर्चा केली आहे. या पार्श्वभूमीवर हे जाणून घेणे देखील आवश्यक बनते की सरकार कशा प्रकारे प्रत्येक क्षेत्राला आपापल्या क्षमता-दक्षता यांचा वापर करण्याचे मोकळे स्वातंत्र्य आणि आपले सहकार्य देत आहे.

## धोरणात्मक निर्गुंतवणूक : निधी जमवण्याचा स्रोत

अर्थसंकल्पात घोषित सुधारणांवर भर देत केंद्र सरकार "मुद्रीकरण आणि आधुनिकीकरण" या मंत्रासह पुढे जात आहे, जो भारतीयांना सशक्त बनवण्यात मदत करेल. स्वातंत्र्यनंतरच्या काळाच्या गरजांनुसार बनलेले अनेक सार्वजनिक क्षेत्राचे उपक्रम सध्याच्या काळात तोट्यात चालले आहेत. आणि त्यातील अनेकांना सार्वजनिक धनाच्या मदतीची गरज आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर भार येतो. अशा वेळी वर्षाचा अर्थसंकल्प खासगी क्षेत्रांच्या भागीदारीचा विस्तार करणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थाना मजबूत करण्याचा स्पष्ट मार्गदर्शक आहे. पंतप्रधान या गोष्टीवर भर देतात की सरकारचे काम उद्योग व्यवसाय करणे हे नाही. याच संकल्पनेवर भर देत अर्थसंकल्पात प्रस्तावित राष्ट्रीय संपत्ति मुद्रीकरण पाइपलाइनच्या

# कृषी क्षेत्र अर्थसंकल्पात वाढली व्याप्ती ...

## समग्र दृष्टिकोनामुळे होईल कायापालट

**1.28**

लाख कोटी रुपये या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला देण्यात आले आहेत.

भारत शेती प्रधान देश आहे. इथले कृषी क्षेत्र अपार संधींनी भरलेले आहे. मात्र तरीही 65 ते 70 हजार कोटी रुपयांचे खाद्य तेल आपण बाहेरून आयात करतो. विडंबनेची हीच साखळी तोडण्यासाठी आज केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. डाळींचे उदाहरण आपल्या समोर आहे. भारतात उत्पादनाच्या प्रचंड संधी असूनही आधी आपण आपल्या वापरासाठी डाळी बाहेरून खरेदी करत होतो, मात्र धोरण बदलल्यामुळे आता यात सातत्याने घट झाली आहे.

**₹ 40** हजार कोटी रुपयांच्या माध्यमातून गावांमधील पायाभूत सुविधा सुधारण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल

**50%**

अनुदान दिले जात आहे ऑपरेशन ग्रीन अंतर्गत भाजी आणि फळांच्या वाहतुकीवर

**दुग्ध, मधमाशी आणि मासे उत्पादनाच्या दिशेने देखील उत्पादनाला प्रोत्साहन देणारी पावले उचलण्यात आली आहेत. प्रथमच पशुपालक आणि मच्छिमारांना किसान क्रेडिट कार्डशी जोडण्याची सुरुवात केली जात आहे.**

- कृषी क्षेत्र सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राची सर्वात उत्तम भागीदारी बनू शकते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्या 12 कोटी छोट्या शेतकऱ्यांचे देखील महत्वपूर्ण योगदान असते जे दिवस -रात्र मेहनतीने शेती करतात, मात्र वास्तवात त्यांना या मेहनतीचे योग्य मोल मिळत नव्हते.
- शेतकऱ्यांकडून पिकवण्यात आलेली फळे आणि भाजीपाला मंडी पर्यंत पोहचण्यापूर्वीच खराब व्हायचे. यासाठी ऑपरेशन ग्रीन अंतर्गत 300 किसान रेल्वेची सुरुवात करण्यात आली, तेव्हा त्यावर 50 टक्के अनुदान देखील देण्यात आले.
- अलिकडेच अर्थसंकल्पात कृषी कर्जाची व्याप्ती वाढवून 16 लाख 50 हजार कोटी रुपये करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचे योग्य मूल्य मिळावे यासाठी आणखी 1000 मंडईना ई-नामशी जोडले जात आहे.
- शेतकरी उत्पादक संघ(एफपीओ) आणि एपीएमसी मंडईचे नेटवर्क आणखी मजबूत करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात आली आहेत. या महत्वपूर्ण पावलांबरोबरच केंद्र सरकारचे लक्ष आता कृषी नंतर त्या शेतमालाच्या योग्य निराकरण आणि अन्न प्रक्रियेवर आहे.

अंतर्गत चार धोरणात्मक क्षेत्र वगळून उर्वरित सर्व 1 0 0 सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे मुद्रीकरणाचे लक्ष्य ठेवले आहे, कारण सरकारकडे अशा अनेक मालमत्ता आहेत ज्यांचा पूर्ण वापर झालेला नाही किंवा बेकार पडून आहेत. अशा 100 मालमत्तांमधून 2 . 5 लाख कोटी रुपये गोळा होतील. सरकारचे प्राधान्य जमाकर्त्यांचा आणि गुंतवणूकदारांचा विश्वास आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे आहे. वित्तीय क्षेत्राला मजबूत बनवण्याच्या दृष्टिकोनासह अर्थसंकल्पाचा उद्देश सामान्य कुटुंबाची उत्पन्न सुरक्षा, गरीबांपर्यंत सरकारी लाभ प्रभावीपणे आणि कुठलीही गळती न होता पोहचवणे आणि पायाभूत विकासाशी संबंधित गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आहे. यासाठी सरकारकडून आर्थिक मदतीच्या ऐवजी उत्पादनाला प्रोत्साहन देणारे धोरण वास्तवात लागू केले आहे जेणेकरून निकोप स्पर्धेसह भारत जागतिक बाजारपेठेत आपली स्वतंत्र ओळख आणि विश्वास निर्माण करेल.

निश्चितपणे अशा प्रकारचा अनोखा प्रयोग आणि प्रयत्न प्रथमच होत आहे ज्यात सरकार आपला हस्तक्षेप कमी करून आपल्या लोकांच्या क्षमतेवर अधिक विश्वास ठेवत आहे. याचे कारण आहे की कोरोना नंतरच्या बदललेल्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या संधींनी सरकारला देखील संधी दिली आहे तर देशातील सामान्य नागरिकांमध्ये देखील आत्मनिर्भरतेचे स्वप्न साकार करण्याचे आकर्षण निर्माण झाले आहे. अशा वेळी देशाच्या विकास यात्रेत सरकार एक मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहून खासगी क्षेत्राला सारथी बनवत आहे, जो अशा आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत आपले महत्वपूर्ण योगदान देऊ शकेल जिथे जगातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात भारतीय वस्तूंप्रति आदर असेल, ओढ असेल आणि ती त्याची पहिली पसंती बनेल.



# पर्यावरणपूरक वाहतुकीच्या दिशेने वाटचाल

**स्वच्छ वातावरण हाच निरोगी जीवनाचा आधार आहे. मात्र बदलत्या काळात पर्यावरण सुरक्षितता हे जगासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. भारतासारख्या देशात जिथे नैसर्गिक स्त्रोतांचा बेसुमार वापर सुरु असल्याने पर्यावरणाची स्थिती बिघडत जाण्याच्या मार्गावर होती. अशा स्थितीत, इलेक्ट्रिक वाहनांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारने आणलेली 'फेम इंडिया' योजना एक वरदान ठरली आहे.**

भारताच्या प्राचीन संस्कृतीची आपल्याला शिकवण आहे की निसर्गाकडून तेवढेच घ्या जेवढी गरज आहे. नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनावर आमचा विश्वास आहे.निसर्गासोबतचा समतोल आणि सहजीवन शेकडो वर्षांपासूनच्या आपल्या अस्तित्व आणि विकासाचा महत्वाचा भाग ठरले आहे. जेव्हा पर्यावरणाची काळजी घेण्याविषयी बोलले जाते, त्यावेळी भारतातील लोक सर्वात आघाडीवर असतात, यात काही शंका नाही. शेकडो वर्षांपासून हेच होत आले आहे. अशा स्थितीत, आज हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्ती जगासमोरची सर्वात मोठी आव्हाने आहेत आणि दोन्ही परस्परांशी संबंधित आहेत. त्यांचा सामना करण्याच्या दोन पद्धती आहेत. एक म्हणजे धोरणे, कायदे आणि नियम-आदेशांच्या माध्यमातून आणि दुसरे म्हणजे आपल्या वर्तणुकीत सुधारणा करणे. सातत्याने वाढत असलेले वायू प्रदूषण एक मोठे आव्हान म्हणून आपल्यासमोर उभे आहे. यात सर्वात मोठा वाटा आहे, पारंपारिक इंधनावर चालणा-या वाहनांचा. यावरचा तोडगा शोधण्यासाठी केंद्र सरकारने एक एप्रिल 2015 रोजी पहिल्यांदाच राष्ट्रीय इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन ( इलेक्ट्रिक वाहने अभियान) अंतर्गत, फेम इंडिया - फास्टर अडॉप्शन अँड मॅन्यूफॅक्चरिंग ऑफ (हायब्रीड अँड) इलेक्ट्रिक व्हेईकल) म्हणजेच इलेक्ट्रिक आणि मिश्र-ऊर्जा वाहनांचा जलद स्वीकार आणि उत्पादन योजनेची सुरुवात केली.

# 'फेम इंडिया' योजनेची आवश्यकता का निर्माण झाली ?

**पहिले**

देशात, विशेषतः महानगरांत, प्रदूषणाच्या इतर कारणांपैकी, मुख्य कारण डीझेल आणि पेट्रोलवर चालणा-या गाडयांमधून निर्माण होणारा धूर हे आहे.

**61%** वाटा या प्रदूषणात वाहनांमधून निघणा-या धुराचा असतो.

**दुसरे**

पारंपारिक इंधन म्हणजेच पेट्रोल आणि डीझेलवर चालणा-या वाहनांच्या संख्येच्या बाबतीत भारत जगातील चौथा सर्वात मोठा उत्पादक देश आहे.

एका दशकातच, भारतात अशा वाहनांच्या संख्येत जलद गतीने वाढ झाली आहे.

**तिसरे**

जीवाष्म इंधन म्हणजेच पेट्रोल -डीझेल सारख्या पेट्रोलियम पदार्थांच्या उपयोगात भारत जगात तिस-या क्रमांकावर आहे.

भारत आपल्या एकूण गरजेपैकी 83 टक्के तेल बाहेरून आयात करतो.

- सातत्याने वाढत असलेला तेलाचा वापर, त्यामुळे होणारे प्रदूषण आणि नुकसान कमी करण्यासाठीच 'फेम इंडिया' योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. एवढेच नाही, तर युरोपीय देशातल्या युरो-6 या मानकाच्या धर्तीवर वाहनातून होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी बीएस-4 च्याऐवजी थेट बीएस-6 मानक एक एप्रिल 2020 पासून लागू करण्यात आले आहे.

## फेम इंडिया योजना नेमकी काय आहे ?

- फेम इंडिया योजनेच्या पहिल्या टप्प्यात वर्ष 2015 ते 17 अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर आणि मेक इन इंडिया च्या धर्तीवर इलेक्ट्रिक कार आणि दुचाकी हायब्रीड वाहनांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्याची योजना बनवण्यात आली.
- फेम इंडिया योजनेचे दोन टप्पे आहेत: पहिला टप्पा 31 मार्च 2019 रोजी पूर्ण झाला आणि दुसरा टप्पा एक एप्रिल 2019 पासून सुरु झाला असून तो 31 मार्च 2022 पर्यंत पूर्ण होईल. भारतात जेव्हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होईल, त्यावेळी रस्त्यांवर धावणा-या वाहनांपैकी जास्तीतजास्त वाटा ई-वाहनांचा असावा, जेणेकरुन हवेत होत असलेल्या प्रदूषणाचे विष कमी करण्यासोबतच नागरिकांच्या खिशाची आणि आरोग्याचीही काळजी घेतली जाईल.
- फेम इंडिया योजनेच्या पहिल्या टप्प्यात सुमारे 3 लाख हायब्रीड आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरला प्रोत्साहन देण्यात आले, ज्याची किंमत सुमारे 359 कोटी रुपये इतकी होती. त्याशिवाय, केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाने देशातील विविध शहरातल्या 425 इलेक्ट्रिक आणि हायब्रीड बसेसना मंजुरी दिली असून, त्यासाठी 280 कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. सरकारने या योजनेच्या माध्यमातून 7 हजार ई-बसेस, 5 लाख ई-रिक्षा, 55 हजार ई-प्रवासी कार, आणि 10 लाख दुचाकी वाहनांना अनुदान देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
- या योजनेचा मुख्य उद्देश प्रदूषण कमी करणे आणि ग्रीनहाऊस वायू उत्सर्जन कमी करणे हा आहे. डीझेल आणि पेट्रोलच्या जागी हायब्रीड आणि इलेक्ट्रीकल दुचाकी गाड्या, कार, तीनचाकी गाड्या आणि हलक्या तसेच वजनदार व्यावसायिक वाहनांसाठीच्या पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत.
- फेम इंडिया योजनेमुळे आपण दररोज सुमारे 52,794 लीटर इंधनाची बचत करु शकलो आहोत.





**₹29,000**

रुपयांचे अनुदान हायब्रीड दोनचाकी वाहनांच्या खरेदीवर फेम योजने अंतर्गत दिले जाईल.



**₹1,38,000**

रुपयांचे अनुदान इलेक्ट्रिक कारच्या खरेदीवर दिले जाईल.

**500** | दशलक्ष इंधनाची बचत केली गेली आहे, या योजनेच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंत.

> नागरीकांना प्रदूषण मुक्त वाहतुकीच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी 'फेम इंडिया'योजनेची सुरुवात केली गेली होती. या योजनेला सर्वसामान्य नागरिकांसह वाहन ऑपरेटर्सचाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याशिवाय, स्वच्छ पेट्रोल आणि डीझेलची उपलब्धता ही प्रदूषण समाप्त करण्याची पहिली अट आहे. त्यासाठीच आम्ही बीएस-6 ची सुरुवात केली आहे. यामुळे प्रदूषण 75 ते 80 टक्क्यांनी कमी झाले आहे.
>
> **-प्रकाश जावडेकर.**
> केंद्रीय वन, पर्यावरण आणि हवामान बदल तसेच अवजड उद्योग मंत्री



# आकडे सांगती यशाची कहाणी..

**3.37** लाख इलेक्ट्रिक वाहनांची आतापर्यंत विक्री

**20,05,91,605** किलोग्राम कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यात यश म्हणजेच दररोज **1,30,835** किलोग्राम कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी..

**6,690** इलेक्ट्रिक बसेसना मिळाली मंजुरी

**3,397** ई-चार्जिंग स्टेशन्सची स्थापना पूर्ण

**2,80,830** अनुदानांच्या दाव्यानुसार आतापर्यंत 3,59,58,08,700 रुपयांची सवलत देण्यात आली आहे

**56,499** इलेक्ट्रिक वाहनांची फेम इंडिया योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत विक्री.

**8,06,46,229** लिटर इंधनाची बचत-फेम योजना लागू झाल्यानंतर

**7500 ते 1.5 लाख** रुपयांपर्यंतचे अनुदान 30 कंपन्या 137 मॉडेल्सच्या दुचाकी आणि चारचाकी गाडयांवर देत आहेत.

(स्त्रोत : केंद्र सरकारचे आकडे -26 फेब्रुवारी 2021 पर्यंतचे)



**बीएस-6 म्हणजे यशाच्या नव्या अध्यायाची सुरुवात :**

संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार, जगात दरवर्षी सुमारे 70 लाख लोकांचा मृत्यू, वायूप्रदूषणामुळे होतो. त्यामुळेच, भारतात वायू प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारने एक एप्रिल 2020 पासून बीएस उत्सर्जन मानकांची सुरुवात केली. केंद्र सरकार वाहनांमुळे होणा-या प्रदूषणासाठी जे मानक तयार करते, त्याला बीएस म्हणजे भारत स्टेज म्हटले जाते. युरोपीय नियमांवर आधारित ही मानके भारतात वन आणि पर्यावरण मंत्रालय आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ निश्चित करते. भारतात उत्सर्जन नियमांची सुरुवात सर्वात आधी 1991 साली झाली होती. मात्र तेव्हा हे नियम केवळ पेट्रोल गाडयांना लागू होते. बीएस मानकांची सुरुवात, वर्ष 2002 साली करण्यात आली. त्यानंतर तीन वर्षांनी 2005 साली, बीएस-2 आणि 2006 मध्ये बीएस-3 ची सुरुवात झाली. 2010 साली बीएस-4 मानक लागू करण्यात आले.मात्र वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेत, पर्यावरण संरक्षणासाठी केंद्र सरकारने 2020 साली बीएस-5 च्या ऐवजी थेट बीएस-6 उत्सर्जन नियम लागू केले. दिल्लीत वेगाने वाढत असलेले प्रदूषण लक्षात घेता तिथे हे नियम सर्वात आधी लागू करण्यात आले.

# 'फेम इंडिया' योजनेशी संबंधित आपल्या प्रत्येक प्रश्नाचे इथे मिळेल उत्तर

Q&A

**इलेक्ट्रिक वाहनाच्या खरेदीवर एक व्यक्ती त्याचा लाभ कसा घेऊ शकेल ?**
जेव्हा एखादी व्यक्ती इलेक्ट्रिक वाहन खरेदी करेल त्यावेळी सरकारकडून त्या वाहनाच्या किंमतीवर सवलत दिली जाईल. सवलतीच्या रुपात हा लाभ मिळेल.

Q&A

**फेम इंडिया सवलत योजना संपूर्ण देशभरात लागू आहे का ?**
या आधीच्या टप्प्याची सुरुवात, काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर करण्यात आली होती. आता मात्र, संपूर्ण देशभर ही योजना लागू करण्यात आली आहे.

Q&A

**जर व्यावसायिक कामांसाठी जसे की-टॅक्सी साठी ई-वाहन खरेदी केले तरीही सवलत मिळेल का ?**
होय. या योजनेअंतर्गत मिळणारी सवलत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी लागू असेल.

Q&A **फेम इंडिया अंतर्गत मिळणा-या सवलती कॉर्पोरेट आणि इतर संस्थांसाठीही उपलब्ध आहेत का?**
हो, या सवलती कॉर्पोरेट आणि इतर संघटनांसाठीही उपलब्ध आहेत.

Q&A **एकापेक्षा अधिक ई-वाहनाच्या खरेदीसाठीही ही सवलत लागू असेल का?**
होय, एक व्यक्ती कितीही इलेक्ट्रिक वाहने खरेदी करु शकते आणि त्या सर्वांवर त्यांना सवलती मिळू शकतात.

Q&A **फेम इंडिया योजनेअंतर्गत अनुदान मिळवण्यासाठी जुनी पारंपरिक इंधन असलेली वाहने विकणे आवश्यक आहे का?**
नाही. सध्या असलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अशी कुठलीही अट नाही.

Q&A **बाजारात उपलब्ध असलेली इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहने वापरण्यासाठी सुरक्षित आहेत का?**
या दृष्टीने हे वाहन संपूर्ण सुरक्षित आहे. कारण फेम इंडिया योजनेअंतर्गत सर्व निकष पूर्ण केल्यानंतरच, या वाहनांची निवड केली जाते.

Q&A **या योजनेअंतर्गत कोणत्या श्रेणीतील इलेक्ट्रिक वाहने समाविष्ट करण्यात आलेली नाहीत?**
ई-रिक्षा, २- इलेक्ट्रिक सायकल्स,३ –कारखाने, विमानतळे इत्यादी ठिकाणी बंद परिसरात प्रवासी अथवा सामानाची वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी वाहने, ४- इलेक्ट्रिक चेअर-कार, आणि अशी सगळी वाहने जी थेट जुन्या इंधनाचा वापर कमी करण्यासाठी उपयुक्त नाहीत, त्यांचा समावेश 'फेम इंडिया' योजनेअंतर्गत करण्यात आलेला नाही.

Q&A **फेम इंडिया योजनेअंतर्गत समाविष्ट होण्यासाठी काय काय परीक्षण करण्यात आले? इलेक्ट्रिक/हायब्रीड वाहनांचे पुन्हा परीक्षण केले जाणे आवश्यक आहे का?**
हो. या योजनेअंतर्गत सवलतींचा लाभ घेण्यासाठी, मार्गदर्शन सूचनांमध्ये काही पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत, पात्र ठरण्यासाठी हे पात्रता निकष पूर्ण करावे लागतील.अशा वेळी चाचणी संस्थांद्वारे देखील सर्व वाहनांचे परीक्षण होणे आवश्यक आहे.

## नव्या नियमांमुळे काय बदल झाले आहेत?

नव्या मानकांमध्ये अनेक बाबींचा समावेश करण्यात आला आहे, जसे की नव्या गाडयांची इंजिने नव्या निकषांनुसार तयार केले जातील आणि जे इंधन या गाडयांसाठी वापरले जाईल, ते देखील या निकषांनुरूप असावे लागेल. प्रदूषण कमी करण्यासाठी वाहनांमध्ये जिथे इंधन जळते, त्या चेंबर्सच्या रचनेतही सुधारणा करण्यात आली आहे, जेणेकरुन हानिकारक गैसची निर्मिती कमी केली जाऊ शकेल. वायू प्रदूषण करण्यात पार्टिक्यूलेट मॅटर (हानिकारक कण) ची भूमिका महत्वाची असते. बीएस-6 मानक लागू करून आता या कणांचे प्रमाण कमी करण्यात आले आहे. हवेत पीएम 2.5 ची जास्तीत जास्त पातळी 60 एमसीजीएम पर्यंत असायला हवी. बीएस-6 मध्ये हे प्रमाण 20 ते40 एमसीजीएम असते. तर बीएस-4 मध्ये हे प्रमाण 120 एमसीजीएम पर्यंत असते. बीएस-4 च्या इंधनात सल्फरचे प्रमाण 50 मिलीग्राम/ किलोग्राम असे. मात्र, आता बीएस-6 मध्ये हे प्रमाण 10 मिलीग्राम/एक किलोग्राम एवढे आहे.

एक एप्रिल 2020 पर्यंत देशात केवळ बीएस-6 मानकांचे निकष पूर्ण करणा-या वाहनांची विक्री अनिवार्य करण्यात आली आहे, जेणेकरुन हळूहळू जुन्या वाहनांची संख्या कमी होऊन नव्या मानकांची वाहने रस्त्यावर येतील. पर्यायाने, वायू प्रदूषण कमी होईल. ●



## प्रधानमंत्री मुद्रा योजना

# लघु व्यापा-यांचा भक्कम आधार

**जेव्हा कौशल्याला प्रोत्साहन दिले जाते, तेव्हा ते अधिकच उत्तम,अधिक सफाईदार बनते. आयुष्यात चांगला बदल घडतो. सहा वर्षांपूर्वी सुरु करण्यात आलेली प्रधानमंत्री मुद्रा योजना याच विचारांना प्रत्यक्ष रूप देणारी आहे. या अंतर्गत, देशातील 28 कोटींपेक्षा अधिक युवक, महिला आणि ज्यांना आपला व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे, अशा सर्व अर्जदारांना दलालांपासून मुक्त करत सरकार ने आर्थिक स्त्रोत निर्माण करण्याची एक संधी दिली आहे, जेणेकरुन हे सगळे घटक आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सशक्त व्हावेत.**

> **“मुद्रा योजनेचा उद्देश-ज्याच्याकडे पैसा नाही, त्याला पैसा उपलब्ध करुन देणे हा आहे. भारतातील लघु उद्योजकांचे आजवर सावकारांकडून शोषण होत असे.. मात्र, मुद्रा योजनेमुळे त्यांच्यात हा विश्वास निर्माण होईल की ते ही राष्ट्र निर्मितीत महत्वाचे योगदान देत आहेत आणि देश त्यांच्या या प्रयत्नात त्यांची मदत करेल.”**
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

मध्यप्रदेशांतील बनखेडी इथे राहणारे प्रमोद शर्मा यांचे लहानसे दुकान होते. मात्र त्यातून एवढे उत्पन्न मिळत नव्हते, की कुटुंबाचा खर्च भागवला जाऊ शकेल. म्हणून, त्यांनी आपला व्यवसाय वाढवण्याचा विचार केला आणि कर्ज घेण्यासाठी बँकेत गेले. मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज घेण्यासाठी अर्ज भरला. लवकरच त्यांना 9 लाख रुपयांचे कर्ज मिळाले आणि त्या अर्थसहायातून केवळ प्रमोद यांचेच नशीब पालटले नाही, तर संपूर्ण कुटुंबच सुखी झाले. एवढेच नाही, तर आणखी चार जणांना रोजगार देऊन, त्यांच्याही उपजीविकेचा ते आधार बनले आहेत. प्रमोद यांची मेहनत आणि चिकाटीमुळे केवळ 10 महिन्यात त्यांच्या दुकानाची उलाढाल 50 लाखांपेक्षा अधिक झाली. प्रमोद शर्मा यांच्याप्रमाणेच, मुद्रा योजनेतून कर्ज घेऊन आयुष्य सुखकर करणा-यामध्ये रायपूर च्या राजकुमारी वर्मा यांचेही नाव सांगता येईल. त्यांचे स्वतःचे भाजीचे दुकान होते. मात्र एका रात्री बाजारात लागलेल्या आगीत त्यांचेही दुकान जाळून खाक झाले. त्यांना या संकटातून बाहेर पडण्याचा काहीही मार्ग सापडत नव्हता. चोहीकडे अंधार पसरल्यासारखी परिस्थिती झाली होती. अशा स्थितीत त्यांना मुद्रा योजनेविषयी कळले. मग एकदिवस त्या आपल्या जवळच्या बँकेत गेल्या आणि तिथल्या अधिका-यांना आपली सगळी परिस्थिती सांगितली. त्यानंतर राजकुमारी यांना मुद्रा योजनेअंतर्गत चार लाख रुपयांचे कर्ज मिळाले. त्यांनी पुन्हा आपले भाजीचे दुकान सुरु केले. अशा कथा आपल्याला देशाच्या प्रत्येक भागातून आपल्याला ऐकायला मिळतात. त्याचे कारण, मुद्रा योजनेच्या सुरुवातीलाच केंद्र सरकारने या योजनेमागे जो विचार दिला, तो महत्वाचा आहे. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते—“ कोणीही युवक-युवती, ज्यांना आपल्या बळावर काहीतरी करण्याची इच्छा असते. तेव्हा त्यांच्यापुढे पहिला प्रश्न असतो की यासाठी पैसे कुठून आणणार? मुद्रा योजनेअंतर्गत ही हमी सरकार देत आहे.”

## मुद्रा योजना काय आहे ?

**देशात मोठ्या प्रमाणावर लघु व्यापारी आणि उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी 8 एप्रिल 2015 रोजी पंतप्रधानांनी मुद्रा योजनेची सुरुवात केली. अशा गरजू लोकांना 10 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देणे हा तिचा मुख्य उद्देश आहे.**

# या योजनेअंतर्गत, तीन स्तरावर कर्ज दिले जाते

● शिशु- 50 हजार रुपयांपर्यंत ● किशोर -50 हजार रुपये ते 5 लाख रुपयांपर्यंत ●युवा- 5 लाख ते 10 लाख रुपयांपर्यंत

### पात्रता काय आहे ?

कोणीही भारतीय नागरिक नवा व्यवसाय सुरु करु इच्छित असेल आणि ज्याला 10 लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची गरज असेल, तो मुद्रा कर्जासाठी कुठल्याही बँकेत किंवा बिगर बँकिंग वित्तीय संस्थेत मदत मागू शकतो.

### लाभ कसा मिळवावा ?

कर्ज घेणारी व्यक्ती किंवा संघटना/उपक्रम, संकेतस्थळावर दिलेल्या यादीमधून कोणत्याही संस्थेकडून कर्जासाठी निधीची मागणी करू शकते.

त्याशिवाय, www.udyamimitra.in या संकेतस्थळावर देखील ऑनलाईन अर्ज भरू शकतात.

# स्वप्न युवकांचे, हमी सरकारची

- योजना सुरु झाल्यानंतर 8 मार्च 2021 पर्यंत 28.36 कोटी लोकांनी कर्ज घेतले आहे. यापैकी सुमारे 70 % कर्ज महिला उद्योजकांना मिळाले आहे.
- आतापर्यंत 15 लाख कोटी रुपयांचे कर्ज छोट्या उद्योजकांपर्यंत पोचले आहे. लाभार्थ्यांपैकी 50 टक्के संख्या अनुसूचित जाती, मागासवर्ग, वंचित समाजाच्या उद्योजकांची आहे.
- केवळ बँकच नाही, त्याशिवाय प्रादेशिक ग्रामीण बँक, सहकारी बँक, सूक्ष्म वित्त संस्था आणि बिगर बँकिंग वित्तीय संस्था देखील मुद्रा कर्ज देऊ शकतात.
- बँकांनी कर्ज घेण्याची प्रक्रिया आणखी सुलभ करण्याचेही काम केले आहे. कागदपत्रे जमा करायला त्रास होऊ नये यासाठी कागदोपत्री कार्यवाही देखील सुटसुटीत करण्यात आली आहे.
- मुद्रा कर्जासाठी कोणाच्याही हमीची गरज नसते. मुद्रा कर्ज परत फेडण्याचा जास्तीत जास्त काळ पाच वर्षे आहे.
- मुद्रा योजनेअंतर्गत, दुकानदार, फळे-भाजीपाला विक्रेता, ट्रक आणि इतर वाहन चालक, हॉटेल मालक, लघुउद्योग, कारागीर आणि इतर लोक या कर्जासाठी अर्ज करु शकतात.

| वित्तीय वर्ष | कर्ज मंजूर आकडे | रक्कम मंजूर | रक्कम वितरीत |
|---|---|---|---|
| 2015-16 | 3.49 कोटी | 137449.27 | 132954.73 |
| 2016-17 | 3.97 कोटी | 180528.54 | 175312.13 |
| 2017-18 | 4.81 कोटी | 253677.10 | 246437.40 |
| 2018-19 | 5.99 कोटी | 321722.79 | 311811.38 |
| 2019-20 | 6.23 कोटी | 337495.53 | 329715.03 |
| 2020-21 | 3.88 कोटी * | 247662.88* | 233274.67* |

आकडे कोटी रुपयांमध्ये स्रोत –mudra.org.in

* वित्त वर्ष 2020-21 चे अंतिमपूर्व आकडे

### असा करा अर्ज ..

- लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी मुद्राच्या संकेतस्थळावरील अर्ज डाऊनलोड करावा लागेल आणि त्यात आवश्यक ती सर्व माहिती भरावी लागेल.

  त्यानंतर, जवळच्या बँकेत जाऊन संबंधित बँकेचा अर्ज भरावा लागेल
- अर्जदाराला फॉर्ममध्ये विचारलेली पूर्ण माहिती- जसे, नाव, पत्ता, मोबाईल नंबर,आधार क्रमांक भरावा लागेल आणि सर्व कागदपत्रांची सत्यप्रत बँकेत जमा करावी लागेल.
- त्यानंतर बँक अधिकारी आपला अर्ज आणि सर्व कागदपत्रांची तपासणी करतील आणि एका महिन्याच्या आत कर्जाची रक्कम आपल्या बँक खात्यात जमा केली जाईल.

एक काळ असा होता, ज्यावेळी कर्ज त्याच व्यक्तीला मिळत असे, ज्याची ओळख असेल. या पद्धतीने गरिबांना बँकिंग व्यवस्थेबाहेरच ठेवले, कारण त्यांच्याकडे न कोणते मोठे नाव होते आणि ना कोणाची शिफारस. आर्थिक गरज भागवण्यासाठी अनेकदा लोक सावकारांच्या कचाट्यात फसत असत. मुद्रा योजना अशी योजना आहे जी कुठलाही भेदभाव न करता, मागासलेल्या, वंचित समाजाला आर्थिक आणि सामाजिक ताकद देण्याचे, त्यांना सक्षम करण्याचे काम करत आहे.

# आता आरोग्यासाठी सुरक्षित 'निधी'चा आधार



जनतेचे निरोगी आयुष्य देशाच्या आर्थिक आरोग्याच्या दृष्टीने इतके महत्वाचे असते, की, सरासरी आयुर्मान एक वर्षाने जरी वाढले तरी देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न 4 टक्क्यांनी वाढते. अशा स्थितीत, आरोग्य क्षेत्र सरकारच्या प्रमुख स्तंभात सर्वात महत्वाचे बनले आहे आणि लाखो नोक-यांच्या संधी यामुळे निर्माण झाल्या आहेत. विशेषतः महिलांसाठी या क्षेत्रात जास्त संधी आहेत. ही गरज लक्षात घेत सरकारने 2018च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात 3 टक्के शिक्षण उपकराच्या ऐवजी 4 टक्के आरोग्य आणि शिक्षण उपकर लावण्याची घोषणा केली होती. आता सरकारने आरोग्य उपकराचा एक भाग, आर्थिक वर्षाच्या शेवटी परत जाऊ नये आणि सामान्य जनतेला आरोग्य निधीची कमतरता भासू नये यासाठी, 'विशेष निधी' म्हणून ठेवण्याची व्यवस्था केली आहे.




**निर्णय:** सर्वांपर्यंत परवडणा-या आरोग्य सुविधा पोहोचविण्याच्या दिशेने महत्वाचे पाउल उचलत पंतप्रधानांनी आरोग्य सुरक्षा निधी तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर केला.

**परिणाम:** यामुळे निश्चित संसाधनांच्या उपलब्धतेमुळे युनिवर्सल हेल्थकेअर म्हणजेच सर्वांना परवडणा-या आरोग्य सुविधा पुरवल्या जाऊ शकतील. सोबतच, यात जमा झालेला निधी वापरला गेला नाही, तरीही तो आर्थिक वर्षाच्या शेवटी परत जाणार नाही.

---

- म्हणजे सार्वजनिक खात्यात आरोग्य क्षेत्रासाठी एक विशेष 'सिंगल नॉन लॅप्सेबल रिझर्व फंड' तयार होईल.
- आरोग्य आणि शिक्षण उपकर यामधून आरोग्य उपकर पंतप्रधान आरोग्य सुरक्षा निधी (पीएमएसएसएन) मध्ये जमा केला जाईल. यात जमा झालेला निधी या प्रमुख योजनांसाठी वापरला जाईल:
  - आयुष्यमान भारत – पीएम जय आणि हेल्थ वेलनेस केंद्र
  - राष्ट्रीय आरोग्य मिशन
  - पीएम आरोग्य सुरक्षा योजना
  - आरोग्याशी संबंधित संकटांच्या काळात
- राष्ट्रीय आरोग्य धोरण – २०१७ अंतर्गत निर्धारित सतत विकास लक्ष्य (एसडीजी) करण्याच्या दिशेने कुठलाही प्रभावी कार्यक्रम.



# जन औषधी केंद्र: गरीब- मध्यमवर्गाचा सोबती

**लहानांपासून मोठ्यांपर्यंत, महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, पंतप्रधान जन औषधी केंद्र घेत आहे सर्वांची काळजी. कमी किंमतीत सर्वांपर्यंत औषधे पोहोचविली जात आहेत, जेणेकरुन कुणीही उपचारापासून वंचित राहणार नाही. याच शृंखलेत शिलॉंग येथे पंतप्रधानांनी केले 7500 व्या जन औषधी केंद्राचे उद्घाटन.**

"मला उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदय रोग आहे. यामुळे माझा दर महिन्याचा औषधांचा खर्च 5 ते 6 हजार रुपये होता. मात्र जेंव्हापासून राज्यात जन औषधी केंद्र सुरु झाले, तेंव्हापासून मला ती सर्व औषधे 800 ते 1000 रुपयात मिळतात." पंतप्रधांनाना देवदूत मानणा-या हिमाचल प्रदेशच्या शिमला जिल्ह्यातील ठीयोग तालुक्यातील सरोग गावच्या कृष्णा वर्मा भावूक होऊन सांगतात. खरं म्हणजे 2014 नंतर देशभरात जन औषधी केंद्रे वाढविण्याची जणू चळवळच सुरु झाली, जी गरीब आणि मध्यमवर्गासाठी एक वरदान ठरली आहे. गरिबाला स्वस्त औषध मिळावे आणि औषधाअभावी कुणाचा जीव जाऊ नये, याच विचाराने देशात जन औषधी केंद्र मोहीम राबवली गेली. आणि आता 7 मार्च रोजी, तिस-या जन औषधी दिवशी देशातील 7500वे जन औषधी केंद्र शिलाँग येथे सुरु करण्यात आले. या प्रसंगी पंतप्रधान म्हणाले, "7500 च्या टप्प्यावर पोहोचणे यासाठी महत्वाचे आहे, कारण 6 वर्षांपूर्वी देशात अशी 100 दुकाने सुद्धा नव्हती. आपल्याला शक्य तितक्या लवकर 10,000 चे लक्ष्य गाठायचे आहे." वर्ष 2014 पासून जन औषधी केंद्राची संख्या तर वाढली आहेच, त्यासोबतच औषधांच्या विक्रीत देखील उल्लेखनीय वाढ झाली आहे. पंतप्रधान जन औषधी केंद्र रुग्णांचे सच्चे मित्र म्हणून समोर येत आहेत. परवडणा-या दरात मिळणारे औषधे प्रत्येक नागरिकाला निरोगी बनवतील आणि जन औषधी केंद्र निरोगी आणि आत्मनिर्भर भारत बनवतील.

## सेवा आणि रोजगार सुद्धा.

**7500** पंतप्रधान जन औषधी योजनेअंतर्गत डोंगराळ भागापासून ते अंतर्गत भागांपासून ते महानगरांपर्यंत जन औषधी केंद्र सुरु आहेत

- या केंद्रांवर 1400 पेक्षा जास्त औषधे, सुविधा पॅड आणि सिरींज सारखे 204 पेक्षा जास्त सर्जिकल उपकरण बाजारभावाच्या 50 ते 90 टक्के कमी किंमतीवर उपलब्ध आहेत.
- दर रोज जवळपास 10 लाख रुग्णांना स्वस्त औषधे उपलब्ध करण्यात आली आहेत. गेल्या सहा वर्षात गरजू लोकांची जवळपास 9 हजार कोटी रुपयांहून अधिक बचत झाली आहे.
- स्वस्त दरात उपलब्ध असणा-या औषधांची गुणवत्ता खूप चांगली आहे, कारण ही औषधे फक्त डब्ल्यूएचओ-जीएमसी मान्यताप्राप्त निर्मात्यांकडूनच खरेदी केली जातात.
- एनबीएएल सारख्या प्रयोगशाळेत तपासण्या करूनच ही भारतीय जन औषधी केंद्रावर पाठवली जातात.
- जन औषधी केंद्र चालकांना 5 लाख रुपयांपर्यंतचे अर्थ सहाय्य आणि महिला उद्योजकांना, दिव्यांग, अनुसूचीत जाती, जमाती, ईशान्येकडील राज्ये आणि डोंगराळ भागातील अर्जदारांना अतिरिक्त 2 लाख रुपयाचे अर्थसहाय्य दिले जाते.

## सर्वांची काळजी घेणारे जन औषधी केंद्र



मुलांसाठी 'जन औषधी बचपन' योजने अंतर्गत लंगोट (डायपर) पुरविण्यात आले.



'जन औषधी जननी' मोहिमेत गर्भवती महिलांना पोषण आणि पूरक आहार पुरवला जातो.




ज्येष्ठ नागरिकांना 'जन औषधी स्वाभिमान' ॲडल्ट डायपरचा पुरवठा.



तंबाखूच्या व्यसनमुक्तीसाठी 'जन औषधी निर्मल' उत्पादन उपलब्ध.



स्टेंट, कॅन्सरच्या औषधांच्या किमती निश्चित केल्याने जनतेचे 5066 कोटी रुपये वाचले.



जन औषधी केंद्रांतून औषध खरेदी केल्याने रुग्णांची 9000 कोटीपेक्षा जास्त रुपयांची बचत झाली आहे .

# लस मैत्री

## कोरोना विरुद्धच्या लढाईत भारताचा जगाला बुस्टर डोस

**कोरोना विरुद्धच्या लढाईत भारताने संपूर्ण जगासमोर एक उदाहरण ठेवले आणि आता लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देखील स्वत:ला आघाडीवर ठेवले आहे. जगातील दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षा भारतातील लसीकरणाचा दर हा सर्वाधिक आहे. 16 मार्च पर्यंत जगातील 71 देशांमध्ये लसीचे 5.86 कोटी डोस पाठविले असून यातील 36 देशांना पाठविलेले 81.25 लाख डोस हे भेटीच्या स्वरूपात देण्यात आले आहेत.**



मुख्यमंत्र्यांसोबतचा पंतप्रधानांचा संवाद ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

> "देशातील सर्व नागरिकांना माझी विनंती आहे की सगळ्यांनी त्यांची वेळ आली की कोविडची लस नक्की घ्या, तेव्हाच आपण कोरोना साथीच्या आजारापासून वाचू शकतो."

104 वर्षाच्या शाम शरण नेगी यांनी लस घेतल्यानंतर संपूर्ण देशवासियांना उद्देशून केलेले हे आवाहन आहे. नेगी हे स्वतंत्र भारताचे पहिले मतदाता देखील आहेत. हिमाचल प्रदेशमधील किन्नौरमधील रेकॉन्गपिओ येथे जेव्हा ते लस घेण्यासाठी गेले तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी देखील त्यांचे हर्षोल्हासाने स्वागत केले. कोविड लसचा पहिला डोस घेतल्यानंतर बंगळुरु येथील 103 वर्षीय जे कामेश्वरी यांची तब्येत देखील चांगली आहे. तर दुसरीकडे झारखंड, तमाड येथील तानजमडीह गावातील 80 वर्षीय रामकिशोर साहू स्वतः दुचाकी चालवून 68 किलोमीटरचा प्रवास करून लस घेण्यासाठी रांचीला गेले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 100 वर्षीय आई हीरा बेन यांनी देखील लस घेतली आहे.


भारतातील कोविड लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यातील ही काही उदाहरणे आहेत. कोविड-19 च्या समूळ उच्चाटनासाठी भारत सध्या जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम राबवीत आहे. पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचारी आणि आघाडीच्या कर्मचाऱ्यांना लसीचे डोस दिले तर 1 मार्च पासून सुरु झालेल्या दुसऱ्या टप्प्यात 45 ते 60 वर्षापर्यंतच्या गंभीर आजारांनी ग्रस्त लोकांना आणि 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना डोस दिला जात आहे. लसीकरणाच्या 59 व्या दिवशी अर्थात 15 मार्च पर्यंत भारतात सुमारे 3 कोटी 17 लाख लोकांना लसीचे डोस देण्यात आले आहेत. लसीकरणाच्या वेगाच्या बाबतीत भारत जगात फक्त अमेरिकेच्या मागे आहे. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात भारतात सुमारे 1 कोटी 26 लाख डोस तर अमेरिकेत 2.5 कोटी डोस देण्यात आले होते.

### हरिद्वार कुंभ मेळ्यात केंद्रीय पथक तैनात

हरिद्वारमध्ये एप्रिलपासून सुरू होणाऱ्या कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार सज्ज झाले आहे. यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली डॉक्टरांची टीम तैनात करण्यात आली आहे. हे पथक कोविड-19 चा संसर्ग रोखण्यासाठी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करेल.

सुंदर स्वच्छ सुरक्षित

# जगभरातून भारताची स्तुती...




- जागतिक आरोग्य संघटनेनंतर आयएमएफच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ गीता गोपीनाथ म्हणाल्या की कोरोना साथीच्या रोगापासून बचावासाठी लस विकसित करण्यापासून ते ती लस अनेक देशांपर्यंत पोहोचविण्या पर्यंत भारताने जी भूमिका घेतली आहे त्यातून प्रत्येकाने प्रेरणा घेतली पाहिजे.
- लस मैत्री कार्यक्रमा अंतर्गत भारताने जगातील 71 देशांमध्ये ५ कोटी ८६ लाख ४ हजार कोरोना लस डोस पाठविले आहेत. त्यापैकी ८१ लाख २५ हजार डोस भेट म्हणून 36 देशांना देण्यात आले आहेत.
- अँटिगा आणि बार्बाडोसला कोरोना लस दिल्याबद्दल वेस्ट इंडिजचा महान फलंदाज विव्हियन रिचर्ड्स आणि जिमी ॲडम्स आणि रामनरेश सरवन यांनी पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत.
- १६ मार्च रोजी भारताच्या संसदेच्या केंद्रीय सभागृहात खासदारांना संबोधित करताना आंतर संसदीय युनियन अध्यक्ष दुआर्त पाशेको म्हणाले की, लसीद्वारे भारताने संपूर्ण जगाला मदत केली आहे.

## लसीसोबत सावधगिरी देखील आवश्यक

| | आरोग्य कर्मचारी | आघाडीचे कर्मचारी | 45 ते 60 वर्षे वयोगटातील बाधित लोकांच्या संपर्कात असलेले | 60 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक |
|---|---|---|---|---|
| पहिला डोस | 74,08,521 | 74,26,479 | 16,96,497 | 95,19,024 |
| दुसरा डोस | 43,97,613 | 13,23,527 | | |

* 15 मार्च पर्यंत संध्याकाळी 7 वाजेपर्यंतची आकडेवारी, स्त्रोत: आरोग्य मंत्रालय

## कारण काही राज्यांमध्ये कोरोनाची रुग्ण संख्या पुन्हा वाढली आहे

- काही राज्यात कोरोनाची रुग्ण संख्या पुन्हा वाढू लागली आहे. 15 मार्चपर्यंत प्राप्त आकडेवारीनुसार महाराष्ट्र, पंजाब, कर्नाटक, गुजरात आणि तामिळनाडूमध्ये कोरोनाची रुग्ण संख्या पुन्हा वाढली आहे.
- मार्चच्या पहिल्या 15 दिवसांमध्येच देशात अंदाजे 2 लाख 97 हजार नवीन रुग्ण आढळले आहेत. यातील 80 टक्के रुग्ण हे या 5 राज्यांमधील आहेत. गेल्या वेळीच्या तुलनेत दिल्ली आणि हरियाणामध्येही काही प्रमाणात वाढ झाली आहे.
- कोणताही निष्काळजीपणा होऊ नये यासाठी महाराष्ट्रातील काही भागात पुन्हा आंशिक लॉकडाऊन लावावे लागले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत आभासी बैठके घेऊन पुन्हा टेस्टिंग, ट्रॅकिंग आणि ट्रीटमेंट या मंत्रावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. छोट्या शहरांमधील वाढत्या रुग्ण संख्येबाबत पंतप्रधानांनी बैठकीत चिंता व्यक्त केली आणि यासंदर्भात वेगाने उपापयोजना करण्याचे निर्देश दिले. ●

**2,23,432**
**एकूण सक्रीय रुग्ण**

| 11027543 | 158856 | 96.65% |
|---|---|---|
| बरे झालेले रुग्ण | मृत्यू | रुग्ण बरे होण्याचा दर |

**मृत्यू दर (1.39%) आकडेवारी 15 मार्च पर्यंत**

**एकूण तपासणी -** 2416 सरकारी आणि खासगी प्रयोगशाळां मध्ये 22,82,80,763 नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे.



# मैत्री सेतू
## भारत आणि बांगलादेश दरम्यान 'नवीन व्यापार कॉरिडोर'

**भारताचा शेजारी देश असलेल्या बांगलादेश सोबतची केवळ मैत्रीच दृढ होत नाही तर व्यापारासाठी एक मजबूत दुवा देखील प्रस्थापित होत आहे. यामुळे भारताच्या पूर्व आणि ईशान्य प्रदेश आणि बांगलादेश दरम्यान नवीन व्यापार कॉरिडोर होत आहे विकसित**

जेव्हा एखादा पूल बांधला जातो तेव्हा तो दोन भाग किंवा दोन टोकांना जोडतो. परंतु भारतीय सीमेवर दक्षिण त्रिपुरा आणि बांगलादेश दरम्यान वाहणाऱ्या फेनी नदीवरील पूल हा दोन शेजारी देशांच्या हृदयांना देखील एकत्र आणणार आहे. म्हणूनच यांचे नाव 'मैत्री सेतु' असे ठेवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 9 मार्च रोजी याचे लोकार्पण केले. या आभासी समारंभात बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना देखील उपस्थित होत्या. उभय देशांमधील संबंधांचे प्रतिक असलेल्या या पुलाची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या बांगलादेश दौऱ्यादरम्यान पंतप्रधान शेख हसीना यांच्यासह केली होती.

हा पूल तयार झाल्याने, उभय देशांमधील संपर्क सुधारण्या सोबतच पर्यटन आणि व्यापार तसेच बंदर विकासासाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. बंदराला जोडलेल्या प्रत्येक कनेक्टिव्हिटीसाठी सबरूम आणि त्याच्या आसपासचा परिसर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख केंद्र बनेल. यावेळी पंतप्रधानांनी त्रिपुरामध्ये राज्य सरकारमार्फत विकसित केलेले राज्य महामार्ग, इतर जिल्हा रस्ते, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधलेली सुमारे 41 हजार घरे, अगरतला स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत बांधण्यात आलेल्या एकात्मिक आदेश आणि नियंत्रण केंद्र, व्यावसायिक संकुल इत्यादी विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले.

### सेतूमुळे आयुष्य झाले सुकर

- 133 कोटी रुपये खर्चून फेनी नदीवर बांधलेला 1.9 किलोमीटर लांबीचा हा पूल (मैत्री सेतू) भारताच्या सबरूमला बांगलादेशातील रामगडशी जोडतो.
- सबरूम ते रामगड हे अंतर केवळ 80 किलोमीटर असल्याने बांगलादेशातील चटगांव बंदरात जाण्यासाठी त्रिपुरा आता ईशान्येकडील प्रवेशद्वार बनण्यास सज्ज झाले आहे.
- सबरूममध्ये एक एकीकृत चेकपोस्टची स्थापना केली जाईल ज्यामुळे भारत आणि बांगलादेश दरम्यान माल आणि प्रवाशांच्या वाहतुकीस सहाय्य मिळेल.
- फेनी पूल सुरु झाल्यामुळे आता आगरतळा हे आंतरराष्ट्रीय सागरी बंदरापासून भारताचे सर्वात नजीकचे शहर झाले आहे.

पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# क्वाड : भारत-प्रशांत महासागर क्षेत्रात स्थिरतेसाठी महत्वपूर्ण स्तंभ

व्यापाराबरोबरच भारत-प्रशांत महासागर क्षेत्राला स्वतःचे धोरणात्मक महत्त्व आहे. अशा परिस्थितीत, क्वाड हे केवळ या समस्यांच्या समन्वयासाठी एक चांगले व्यासपीठच नाही तर या क्षेत्रातील इतर देशांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी देखील सक्षम आहे. अशा परिस्थितीत, भारत-प्रशांत महासागर क्षेत्रातील स्थिरतेसाठी क्वाड एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ बनले आहे.



भारत जगातील एक शक्तिशाली देश म्हणून उदयास आला आहे, परंतु भारत-प्रशांत महासागर प्रदेशासाठी क्वाडचे स्वतःचे एक विशेष महत्त्व आहे. अलीकडेच 12 मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन आणि जपानचे पंतप्रधान योशिहिदे सुगा यांच्यासोबत चतुर्भुज सुरक्षा संवाद (क्वाड) मध्ये सहभागी झाले होते. क्वाड परिषदे मध्ये सुलभ पुरवठा साखळी, उदयोन्मुख आणि महत्वाचे तंत्रज्ञान, सागरी सुरक्षा आणि हवामान बदल यासारख्या समकालीन आव्हानांवर चर्चा झाली. यामुळे भारत-प्रशांत महासागर प्रदेशातील देशांपासून दूर असलेल्या देशांमध्ये देखील आत्मविश्वास वाढेल. मंत्री स्तरावरील तीन बैठकीनंतर या चारही देशांच्या प्रमुखांनी प्रथमच शिखर परिषदेत भाग घेतला. या बैठकीत कोविड-19 चा सामना करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबाबत आणि भारत-प्रशांत महासागर क्षेत्रात सुरक्षित आणि स्वस्त लसी सुनिश्चित करण्यासाठी परस्पर सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. समृद्ध भारत-प्रशांत महासागर क्षेत्रासाठी क्वाड स्थिरतेचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ होईल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बैठकीत सांगितले.

## क्वाड म्हणजे काय ?

भारत, जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांनी 2007-08 मध्ये धोरणात्मक भागीदारीसाठी याची स्थापना केली होती. क्वाड (QUAD) (क्वॉड्रीलेटरल सिक्योरिटी डायलॉग) अर्थात चतुर्भुज सुरक्षा संवाद. भारत-प्रशांत महासागर प्रदेशात, सामायिक सुरक्षा, पर्यावरण, व्यापार आणि चार देशांशी संबंधित इतर हितसंबंधांच्या संरक्षणाकडे विशेष लक्ष दिले जाते. धोरणात्मक भागीदारीचा भाग म्हणून हे चारही देश वर्षातून एकदा संयुक्त युद्धाभ्यास देखील करतात.

## यावेळी कोरोना लसीसह या मुद्द्यांवर चर्चा झाली

### लस सहभाग

- कोविड-१९ च्या उच्चाटनासाठी क्वाड भागीदारी सुरू करत आहे.
- क्वाड नेते डब्ल्यूएचओ आणि कोवॅक्ससह विद्यमान बहुपक्षीय प्रणालीच्या अनुषंगाने भारत-प्रशांत महासागर परदेशातील देशांना लसीकरण करण्यास मदत करतील.
- भारत-प्रशांत महासागर प्रदेशातील देशांना मदत करण्यासाठी जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाच्या मदतीने भारताची लस उत्पादन क्षमता वृध्दींगत केली जाईल.
- क्वाड भागीदार कमी उत्पन्न असलेल्या आणि गरजू देशांना जीवनरक्षक लस उपलब्ध करून देतील.

- पॅरिस करारामध्ये निर्धारित केलेली तापमानाची मर्यादा कायम ठेवण्यासह इतर मुद्यांच्या अंमलबजावणीत मदत करण्यासाठी क्वाड आणि अन्य देशांमध्ये सहकार्य.
- जागतिक स्तरावर कृतींचे समर्थन करणे, त्यांना बळकटी प्रदान करणे आणि वर्धित करण्यासाठी इतर देशांसोबत कार्य करणे.
- उत्सर्जन कमी करण्यासाठी कमी उत्सर्जन करणार्या तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी वचनबध्द.

पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# शतकानुशतके गीता हा भारताच्या कर्म निष्ठेचे प्रतीक आहे

कोरोना कालखंड असो किंवा मागे महाभारतापासून ते अगदी स्वातंत्र्यलढ्यापर्यंत प्रत्येक काळात 'गीते' ने आपल्या देशाचे मार्गदर्शन केले आहे. गीता हा भारताची एकता आणि एकरूपतेच्या भावनेचा मूळ गाभा आहे. गीतेत सांगितले आहे- - 'समम् सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तम् परमेश्वरम्'। अर्थात, प्रत्येक प्राणीमात्रामध्ये देवाचा वास आहे. याच प्रेरणेतून मार्चमध्ये पंतप्रधानांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या श्लोकांवरील हस्तलिखिते आणि ई-पुस्तकाचे प्रकाशन केले.



श्रीमद् भगवद्गीता हा केवळ ग्रंथ नाही, तर प्रत्येक कालखंडात देशाला आणि विचारवंताना योग्य मार्ग दाखविणारा मानसिक उर्जेचा एक स्रोत आहे. कोरोनासारख्या साथीच्या काळात, जेव्हा संपूर्ण जग प्रतिकूल परिस्थितीतून जात आहे, अशा काळात 'गीते' चे महत्त्व अजूनच वाढते. याच कारणास्तव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्चच्या पहिल्या पंधरवड्यात श्रीमद् भगवद्गीतेच्या श्लोकांवर 21 विद्वानांनी केलेली टिपण्णी असलेल्या हस्तलिखितांचे प्रकाशन आणि व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून स्वामी चिद्भवानंदजी यांच्या भगवद्गीतेच्या किंडल आवृत्तीचे देखील प्रकाशन केले. 'श्रीमद् भगवद्गीताः संस्कृतीतील दुर्मिळ बहुविध भाषणे मूळ सुलेख' या शीर्षकाखाली हस्तलिखिताच्या 11 आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ही हस्तलिखिते विलक्षण विविधता आणि भारतीय सुलेखनाच्या बारकाव्यांसह तयार केली आहे. ज्यामध्ये शंकर भाष्य (ग्रंथांचे सविस्तर स्पष्टीकरण) ते भाषानुवाद पर्यंत सर्व काही समाविष्ट आहे. तर स्वामी चिद्भवानंद यांच्या भगवद्गीतेच्या 5 लाखाहून अधिक प्रतींच्या विक्रीच्या निमित्तीने पंतप्रधानांनी त्याच्या किंडल आवृत्तीचे म्हणजेच ई-पुस्तक प्रसिद्ध केले. तामिळनाडूमधील रामकृष्ण तपोवन आश्रमाचे संस्थापक स्वामीजी यांची आतापर्यंत 186 हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**दोन्ही समारंभात पंतप्रधानांनी गीतेचे महत्व सांगताना केलेल्या भाषणातील महत्वाचे मुद्दे:**

- गीता, भारताच्या वैचारिक स्वातंत्र्य आणि सहिष्णुतेचे देखील प्रतीक आहे, जे प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विचार आणि दृष्टीकोन मांडण्यासाठी प्रेरित करते.
- भारताला एकतेच्या सूत्रात बांधणाऱ्या आदी शंकराचार्यांनी गीता म्हणजे आध्यात्मिक जाणीव या दृष्टीकोनातून पाहिले आणि स्वामी विवेकानंदांसाठी गीता म्हणजे अतूट कर्मनिष्ठा आणि अजोड आत्मविश्वास यांचा स्त्रोत राहिली.
- श्री अरबिंदो यांच्यासाठी गीता म्हणजे ज्ञान आणि मानवता यांचे प्रतिरूप होते. महात्मा गांधींसाठी गीता म्हणजे अनेक कठीण काळात पथदर्शक होती.
- नेताजी सुभाष चंद्र बोस यांची देशभक्ती आणि पराक्रम यांचे स्फूर्तीस्थान गीता होती. या गीतेचा अर्थ बाळ गंगाधर टिळक यांनी उलगडला आणि स्वातंत्र्य लढ्याला नवे सामर्थ्य दिले.
- गीतेने स्वातंत्र्यलढ्याला कशी उर्जा दिली. गीतेने आपल्या देशातील युवा पिढीला ऐक्याच्या आध्यात्मिक सूत्रात कसे बांधून ठेवले आहे. आपल्याला हे पैलू सगळ्यांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- ई-पुस्तक शाश्वत गीता आणि तेजस्वी तमिळ संस्कृती यांच्यातील संबंध अधिक दृढ करेल. हे ई-पुस्तक जगभरातील तमिळ लोकांना सहज वाचता येऊ शकेल.

गीतेच्या किंडल आवृत्तीच्या प्रकाशन प्रसंगी पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



1 एप्रिल जन्मदिन विशेष

# गुरु तेग बहादूर, प्रेम, त्याग आणि बलिदानाचे प्रतीक

> जगातील लाखो लोकांप्रमाणेच मला ही श्री गुरु तेग बहादूर यांच्या अपार कृपेने प्रेरित केले आहे.- नरेंद्र मोदी,पंतप्रधान

**वयाच्या 14 व्या वर्षी, आपण शाळेत आपल्या भविष्याचा पाया रचत असतो, परंतु या वयात त्यागमल नावाच्या मुलाने रणांगणात मुघल सैन्याला सळो की पळो करून सोडले. या पराक्रमासाठी त्याला तेगबहादूर म्हणजेच 'तलवारीचा धनी' असे नाव देण्यात आले आणि नंतर ते शीखांचे नववे गुरु झाले ...**

भारत हा असा देश आहे जेथे प्रत्येक मैलावर संस्कृती, बोलीभाषा आणि खाण्यापिण्याच्या सवयी बदलतात आणि बहुधा जगातील एकमेव असा देश आहे जेथे सर्व धर्मांकडे समान भावनेने पाहिले जाते. अनेक धर्मातील चाली-रिती/परंपरा आणि श्रद्धांना इतर धर्मातही मान्यता दिली आहे. परंतु ही परंपरा मोडीत काढण्याचेही अनेक प्रयत्न झाले. जेव्हा जेव्हा अशा प्रसंगा बाबत चर्चा होते तेव्हा गुरु तेग बहादूर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते ज्यांनी इतरांच्या धार्मिक हक्कांच्या रक्षणासाठी हसत-हसत आपल्या प्राणांचे बलिदान दिले. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया, विद्यापीठा मधील इतिहासाचे प्राध्यापक नोएल किंग म्हणतात की - "गुरु तेग बहादूर यांचे हे बलिदान जगातील मानवाधिकारांच्या रक्षणासाठी केलेले पहिले बलिदान होते." अमृतसरमध्ये जन्मलेले तेग बहादूर हे गुरु हरगोबिंद सिंग यांचे पाचवे पुत्र होते. शिखांचे आठवे गुरु हरिकृष्ण राय जी यांच्या निधनानंतर त्यांना शीखांचे नववे गुरु करण्यात आले. गुरू तेग बहादूर यांनी आध्यात्मिक, सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी अनेक सर्जनशील कामे केली. रुढी, अंधश्रद्धा यांच्यावर टीका करत नवीन आदर्श प्रस्थापित केले.

### जेव्हा हसत-हसत शीर कापले...

असे म्हटले जाते की मुघल बादशहा औरंगजेबच्या दरबारात एक पंडित दररोज येऊन गीतेचे श्लोक वाचून त्याचे अर्थ सांगत असे. परंतु तो पंडित गीतेमधील काही श्लोक सोडून देत असे. एकदा तो पंडित आजारी पडल्यावर त्याने दरबारात गीता वाचून दाखविण्यासाठी आपल्या मुलाला पाठवले, परंतु तो आपल्या मुलाला हे सांगायला विसरला की त्याने कुठल्या-कुठल्या श्लोकाचे अर्थ औरंगजेबाला सांगितले नाहीत. असे म्हटले जाते की औरंगजेबाने पंडिताच्या त्या पुत्राकडून गीतेच्या काही श्लोकांचा अर्थ जाणून घेतल्यावर त्याने असा हट्टच धरला की केवळ त्याचा धर्मच महान आहे आणि सगळ्यांनी त्याचा धर्म स्विकारला पाहिजे. औरंगजेबच्या सांगण्यावरून धर्मांतरण सुरू झाले. यामुळे विचलित झालेले, काही काश्मिरी पंडित गुरु तेग बहादूर यांच्याकडे आले. त्यावेळी गुरु तेग बहादुर यांनी त्या पंडितांना सांगितले की, तुम्ही औरंगजेबला जाऊन सांगा की जर तुम्ही गुरु तेग बहादूर यांचे धर्मांतर केले तर आम्हीसुद्धा तुमची ही अट मान्य करू. औरंगजेबाने गुरु तेग बहादूर यांना अटक केली आणि त्यांचा अतोनात छळ करून त्यांना यातना दिल्या. त्यांच्या समोर त्यांचे दोन शिष्य मती दास आणि सती दास यांचा वध केला, तरीदेखील गुरू तेगबहादूर यांनी त्यांची अट मान्य केली नाही. अखेर, दिल्लीतल्या चांदनी चौकात औरंगजेबाच्या आदेशानुसार गुरु तेग बहादूर यांचे शीर धडापासून वेगळे करण्यात आले. आज त्याच ठिकाणी त्याच्या नावाने शीश गंज साहिब गुरुद्वारा बांधण्यात आला आहे. गुरु तेग बहादुर म्हणायचे - "धर्माचा मार्ग हा सत्याचा आणि विजयाचा मार्ग आहे." त्याच मार्गावर चालत असताना ते शहीद झाले. गुरु तेगबहादूरच्या अनेक रचना संग्रहित आहेत. त्यांचे 11 शबद आणि 15 पदांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट केले आहे. ●

# प्रेरणेचा झरा...

**आपल्या आयुष्यात आपण बऱ्याचदा अनेक लोकांची थोरवी ऐकतो. परंतु त्यामागे त्यांचा अखंड संघर्ष आणि एक प्रेरणादायक प्रवास असतो. प्रेरणेच्या याच मार्गावर मार्गक्रमण करत कोलकताच्या मानसी हळदर एक जीव वाचविण्यात यशस्वी झाली, त्याचप्रकारे मध्य प्रदेशातील एक गाव पर्यावरण संरक्षणाने प्रेरित होऊन एक आदर्श गाव बनले आहे...**

## बांचा देशातील पहिले सौर ऊर्जा आत्मनिर्भर गाव आहे



मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील बांचा गावची गाथा ही केवळ आदर्श गावापर्यंत सीमित नाही. तर ही यशोगाथा आहे स्वतःच्या समस्यांपासून प्रेरणा घेऊन पुढे मार्गक्रमण करण्याची आणि इतरांसाठी एक उदाहरण स्थापित करण्याची. केवळ 74 घरांची वस्ती असलेले हे अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेले हे एकमेव गाव आहे, जेथे प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात फक्त सौर उर्जा वापरली जाते. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नुकतेच या गावात उर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण सोलर कुक स्टोव्ह प्रकल्प सुरू केला आहे. बांचा गावच्या या यशोगाथेवर माहितीपट तयार करणारे माखनलाल चतुर्वेदी, राष्ट्रीय पत्रकारिता विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक लोकेंद्र सिंग आणि निर्माते मनोज पटेल यांचे म्हणणे आहे की या यशाच्या मागे सगळ्या ग्रामस्थांचा संघर्ष लपलेला आहे. ही गोष्ट आहे २०१६ ची, जेव्हा पाण्यासाठी अतोनात हाल सोसत असलेल्या बांचा येथील रहिवाशांनी पावसाचे पाणी अडविण्यासाठी मातीच्या गोणी लावून पावसाचे पाणी साठवायला सुरुवात केली. जेव्हा ते पाण्यामध्ये स्वयंपूर्ण झाले, तेव्हा नंतर सुरवात झाली गावात जमा होणाऱ्या कचऱ्याला प्लास्टिकमुक्त करायला. त्यानंतर ओएनजीसी आणि आयआयटी मुंबईच्या मदतीने नैसर्गिक ऊर्जेवर लक्ष केंद्रित केले. यामागे गावचे वातावरण सुधारणे हे उद्दिष्ट होते आणि मग इथूनच प्रत्येक स्वयंपाकघरात सौर स्टोव्ह बसविण्यात आले. •

## कोरफडी पासून तयार केलेली बॅटरी प्रदूषण कमी करण्याचा एक अनोखा प्रयत्न




बॅटरी किंवा छोटी इलेक्ट्रॉनिक उपकरणे खराब झाल्यानंतर पर्यावरणासाठी ई-कचऱ्याच्या रुपात नवीन समस्या उभी करतात. ई-कचरा मानवी आरोग्यासाठी आणि वातावरणासाठी अत्यंत हानिकारक आहे आणि यात पारा, शिसे, कॅडमियम सारखे विषारी घटक असतात. हे लक्षात घेऊन राजस्थान तांत्रिक विद्यापीठाचे दोन तरुण निमेश आणि नवीन या दोघांनी कोरफडीपासून बॅटरी बनवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा शोध लावला. दोघांनीही या बॅटरीला ALOE बॅटरी असे नाव दिले आहे. कोरफडी पासून तयार केलेली ही बॅटरी पूर्णपणे वेगळी असून शेतकर्यांसाठी खूप उपयुक्त आहे. तसेच याचा वापर विजेरी, घड्याळ, रिमोट आणि खेळण्यांमध्ये केला जाऊ शकतो. सर्वात मोठी बाब म्हणजे एक किलो कोरफडीपासून 125 बॅटरी तयार केल्या जाऊ शकतात. या बॅटरीसाठी नवीन आणि निमिषा यांना वर्ष 2019 मध्ये स्पेनमधील ग्लोबल ग्रीन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, या जोडीला पाच लाख रुपये रोख रक्कम असलेला राष्ट्रीय स्टार्टअप पुरस्कार देखील मिळाला आहे. आता त्यांनी त्यांची ALOE बॅटरी पेटंट करण्यासाठी देखील अर्ज केला आहे. •



PMO India @PMOIndia

जालियांवाला बागेत स्मारक असो किंवा माग पायका चळवळीच्या स्मरणार्थ उभारण्यात येणारे स्मारक असो, सगळी कामे झाली आहेत.
अनेक दशकांपासून विस्मृतीत गेलेली बाबासाहेबांशी निगडीत स्थानांना पंचतीर्थाच्या रूपाने विकसित केली आहेत:पंतप्रधान @narendramodi



Rajnath Singh @rajnat...

जेव्हा मी उत्तरप्रदेशचा मुख्यमंत्री होतो त्यावेळी मी एका मुलाची शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली होती. तो मुलगा आज डॉक्टर झाला आहे.
आज त्याच डॉ. वृजेन्द्रचा विवाहसोहळा होता त्यासाठी मी त्याच्या घरी जाऊन त्याला शुभाशीर्वाद दिले. माझ्यासाठी हा मोठा आनंदाचा आणि समाधानाचा क्षण होता.



Amit Shah @AmitShah

पंतप्रधान @narendramodi यांच्या #VocalForLocal या आवाहनाला अनुसरून मी जवळच्या खादी भंडार मधून एक अंगवस्त्र आणि डायरी विकत घेतली.
नागरिकांनी देखील मोदीजींच्या या आवाहनाला प्रतिसाद द्यावा आणि आपल्या नजीकच्या दुकानातून खरेदी केलेली स्वदेशी वस्तू #VocalForLocal मध्ये सामायिक करा असे मी आवाहन करतो.



Nitin Gadkari @nitin_...

@kvicindia द्वारा गायीच्या शेणापासून तयार केलेला नैसर्गिक रंग हा आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्वपूर्ण ठरेल. रंग तयार करण्याची प्रक्रिया मी प्रसिध्द करत आहे. देशातील प्रत्येक जिल्ह्यातील लोकांनी स्वतः हा रंग तयार करावा असे माझे स्वप्न आहे.
youtu.be/J८३Y९jgp---Q via @YouTube



Dharmendra Pradhan @dpr...

ज्ञान, विज्ञान, शौर्य, अध्यात्म याने समृध्द भारत आपली एकता, अखंडता, लोकशाही आणि विकास यालेने आज आपल्या सुवर्ण आणि भव्य भविष्याचे अनोखे रंग पसरवत आहे.
चला #AatmanirbharBharat च्या निर्मितीमध्ये सामील होऊया आणि देशाच्या स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षानिमित्त #AmritMahotsav साजरा करूया.



Prahlad Singh Patel @pra...

आपला स्वातंत्र्यलढा केवळ अभ्यासक्रमापुरताच मर्यादित राहू नये म्हणून आपल्याला त्यांच्यासमोर उदाहरण ठेवले पाहिजे. या यात्रेचा हाच संदेश आहे, या दिशेने प्रयत्न केले जात आहेत. कष्ट केल्याशिवाय तुम्हाला यशाची गोड फळे चाखता येणार नाहीत. @PMOIndia @JPNadda @incredibleindia @MinOfCultureGoi

पहली बार US राष्ट्रपति से मुखातिब हुए PM मोदी

## बाइडन ने माना, वैक्सीन सप्लाई में भारत है लीडर



पीएम नरेंद्र मोदी ने क्वाड देशों के राष्ट्राध्यक्षों के सम्मेलन को संबोधित किया।

क्वाड ग्रुप से होने वाले फायदे बताएं: कांग्रेस

प्रधानमंत्री मोदी ने कहा कि भारत वसुधैव कुटुम्बकम के दर्शन को मानता है।

## पीएम मोदी ने कोरोना वैक्सीन को भारत की नई ताकत से जोड़ा

अहमदाबाद में 'आजादी का अमृत महोत्सव' समारोह की शुरुआत



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने महात्मा गांधी की दांडी यात्रा को याद करते हुए अहमदाबाद स्थित साबरमती आश्रम से पदयात्रा को हरी झंडी दिखाई।

## भारत ने ईरान, बेनिन, बहामास को कोरोना रोधी टीके की खेप भेजी

## राष्ट्रपति, प्रधानमंत्री समेत कई हस्तियों ने महिलाओं की भूमिका को सराहा

## पीएम ने रखा आजादी के 75वें जश्न का रोडमैप

विशेष संवाददाता, नई दिल्ली

## 'आत्मनिर्भर भारत' मानवता की भलाई के लिए : मोदी

प्रधानमंत्री ने स्वामी चिद्भवानंद की ई-भगवत गीता का किया लोकार्पण

## मोदी के टीका लगवाने के बाद अभियान में तेजी आई

RNI No.
DELMAR/2020/78830
April: 1-15, 2021

NEW INDIA
SAMACHAR
FORTNIGHTLY

RNI Registered No DELMAR/2020/78830, Delhi
Postal License No DL (S)-1/3553/2020-22,
WPP No. U (S)-101/2020-22, Posting at BPC,
Meghdoot Bhawan, New Delhi-110001 on 26-30 advance Fortnightly
(Publishing Date March 20, 2021 Pages-40)

# मीठ सत्याग्रहाचा 91 वा वर्धापन दिन

6 एप्रिल 1930, जेव्हा बापुजींनी एक मुठभर मीठ उचलून ब्रिटीश साम्राज्याचा पाया कमकुवत केला....



"आपल्यासाठी मीठ म्हणजे - प्रामाणिकपणा. आपल्यासाठी मीठ म्हणजे - विश्वास. आपल्यासाठी मिठाचा अर्थ – निष्ठा. आम्ही आजही म्हणतो की आम्ही देशाचे मीठ खाल्ले आहे. मीठ ही अतिशय मूल्यवान वस्तू आहे म्हणून आम्ही असे म्हणत नाही तर आपल्या देशात मीठ हे श्रम आणि समानतेचे प्रतीक आहे. त्यावेळी मीठ हे भारताच्या स्वावलंबनाचे प्रतीक होते. गांधीजींना देशातील ही जुनी पिडा समजली, लोकांशी जोडलेल्यानी ती नाडी ओळखली आणि बघता बघता ही चळवळ प्रत्येक भारतीयाची चळवळ झाली, प्रत्येक भारतीयाचा संकल्प झाला.

- पंतप्रधान नरेंद्र मोदी

Marathi

Editor:
Jaideep Bhatnagar,
Principal Director General,
PIB, New Delhi

Published & Printed by: Satyendra Prakash, Principal Director General, BOC on behalf of Bureau of Outreach and Communication

Published from Bureau of Outreach and Communication, 2nd Floor, Soochna Bhawan, New Delhi -110003

Printed at VIBA Press (P) Ltd. C-66/3, Okhla Industrial Area, Phase-II, New Delhi 110020